॥ श्रीः ॥

गुरुप्रसाद.

हा ग्रंथ

केशव नारायण शास्त्री दामले

प्रणवप्रकाश व परमार्थदर्शन

या ग्रन्थांचे कर्ते

यानीं रचिला.

कोऽपि कीदृक्केवलोऽहं सकलः स्वप्रभोदयः ।
प्रसीदामि विमुक्तो वै सच्चिदानन्दसुन्दरः ॥

तो

पुणें येथें

ठंत 'इंदिरा' छापखान्यांत छापवून प्रसिद्ध केला.

शोभननामसंवत्सरे

हा ग्रंथ केशव नारायण शास्त्री दामले यांनीं
पुणें येथें त्र्यंबक हरी आवटे यांच्या ' इंदिरा ' छापखान्यांत छापवून
पुणें पेठ नारायण घर नंबर ४०६ येथें प्रसिद्ध केला.

प्रस्तावना.

जय देव सच्चिदानंद.

कारणावांचून कार्य नाहीं, फलोद्देशावांचून प्रवृत्ति नाहीं, या नियमानुसार आमच्या या ' गुरुप्रसाद '—रचनेचाहि कांहीं हेतु असला पाहिजे; पण तो असाधारण असा दुसरा कोणता असणार? सर्वांच्या सर्व प्रवृत्तींस जो एक साधारण हेतु असतो तोच हेतु आमच्या प्रस्तुत ग्रंथसंदर्भानेंहि असावयाचा. जो हेतु सर्वसाधारण असतो, तोच हेतु वास्तविक मुख्य समजला पाहिजे; तो व्यापक असतो. अर्थात् आनंदाकरितां सर्वांच्या सर्व प्रवृत्ति असतात हें जर खरें आहे, तर आमचा देखील हा ' गुरुप्रसाद ' आनंदैकमूल आणि आनंदैकप्रयोजन आहे हें उघड आहे. यापेक्षां अधिक योग्य परिहार अन्य कोणताहि देतां येत नाहीं. एरवीं कित्येक इष्टमित्रमंडळीच्या प्रेरणेस्तव हा ' गुरुप्रसाद ' झाला असे अवान्तर कारणें आहेतच, असो. प्रसाद म्हटला ह्मणजे त्याच्या गुणदोषांची चिकित्सा करणें प्रशस्त होणार नाहीं हें खरें आहे; तथापि केवळ एक अभिनव ग्रंथ ह्मणून त्या दृष्टीनें त्याची अन्वर्थकता आहे किंवा नाहीं हा विचार त्याचे ग्राहकांनीं पाहिजेल तर करावा. पण आपल्या बुद्धींत जो जो बोधरूप प्रकाश अखंड होत असतो, तो तो जर आम्हांस त्या श्रीगुरूचा प्रसादच वाटतो, तर मग प्रस्तुतसारख्या ग्रंथांतील प्रतिपाद्यवस्तुविषयक ज्ञाननिश्चय ह्मणजे गुरुप्रसादच आहे असें आम्ही ह्मटल्यास कांहीं अतिशयोक्ति

होणार नाहीं. किंबहुना अशा तात्त्विक आणि पवित्र ज्ञाननिश्चयासच गुरुप्रसाद असें आम्ही समजतों. प्रपंचाचें उदंड ज्ञान असलें तरी त्याचा विशेष महिमा कोणीहि तत्त्ववेत्ते महापुरुष समजत नाहींत. 'अध्यात्मविद्या विद्यानाम्' म्हणजे सर्व विद्येमध्यें आत्मविद्या किंवा ब्रह्मविद्या हीच श्रेष्ठ आहे. ही विद्या म्हणजे आपल्या अनाद्यनंत त्या पारमेश्वरी स्वरूपाची साक्षात् अनन्य दिव्य प्रभाच होय, मृतात्म्यास तर केवळ ही एकच संजीविनी आहे. अशी प्रसादमूर्तिरूप विद्या ज्यापासून उदयास येते, त्यास श्रीगुरुरूपानें आविर्भूत झालेला परमेश्वरच समजला पाहिजे; अशा श्रीगुरूचा हा प्रसाद आहे, हा आत्मोद्धार किंवा आत्मप्रकाश असेंच आम्ही यास मानतों. सारांश, जीवांस नित्यनिरंतर निरतिशयप्रिय म्हणून अभिलषित असणाऱ्या अखण्डशुद्धानंदस्वरूपाचा प्रकाशकच हा गुरुप्रसाद आहे. तशा आनंदस्वरूपाचा जो नित्यलाभ, हाच परमपुरुषार्थ, हाच मोक्ष असें समजावें. यावरून प्रस्तुत गुरुप्रसादसंज्ञित महाग्रंथांतील प्रतिपाद्य विषय कोणता, आणि त्याच्या परिचयापासून लभ्य होणारा फलांश काय याची ओळख त्याच्या ग्राहकांस सहज होणार आहे. एकंदरींत हा ग्रंथ केवल वेदान्तार्थ पतिपादक आहे असें कोणासहि कबूल होईल; तथापि एक गोष्ट अगोदर स्पष्ट सांगितली पाहिजे. ती अशी कीं, प्रस्तुत ग्रंथांतील विचारसरणि, जगद्गुरु श्रीमच्छंकराचार्यांच्या संप्रदायानुसारिणी आहे. या आमच्या मूळ आचार्यांनीं जी एक विचारदिशा जगास दर्शित केली, तीच दिशा परमेश्वरप्रकाशित वेदांस संमत आहे असें आम्ही समजतों. जर ब्रह्मात्मतत्त्वज्ञानाची एखादी निःसीम परिपक्व शुद्धावस्था मिळवितां येईल, तर ती आम्हांस आमच्या या जगद्वन्द्य आचार्यांनीं आपल्या दैविक बोधप्रकाशानें उजळ केलेल्या दिशेनेंच लाभेल. थोडक्यांत आम्ही

इतकेंच सांगतों कीं, भयदुःखरूप प्रपंचांतून मुक्त होऊं इच्छिणाऱ्यासाठीं त्या आमच्या आचार्यवरिष्ठांनीं शुद्ध वैदिक धर्माच्या तत्त्वज्ञानप्रधान अशा निवृत्तिसंज्ञित भागाची जी आह्मांस ओळख करून दिली आहे, तिच्याबद्दल या भूमंलाडवरील सर्व तत्त्वविचाररसिक महापुरुष अत्यंत ऋणी आहेत, याबद्दल कोणाचा मतभेद असेल असें आह्मांस तरी निदान वाटत नाहीं. एवंच अशा जगद्गुरूंच्या मताचे अनुसारी हा ग्रंथ आहे. याचे पांच भाग आह्मीं केले आहेत. पहिल्या भागांत परमपुरुषार्थ जो मोक्ष, त्याच्या प्राप्तीचें मुख्य साधनाविषयीं वेदशास्त्रांचा निर्णय काय आहे तो स्पष्टपणें उल्लिखित केला आहे; दुसऱ्या भागांत सारासारविवेक किंवा आत्मानात्मविवेक सांगितला आहे; तिसरे भागांत सारभूत आत्मतत्त्वाचा निदिध्याससंज्ञित मुख्य अभ्यासक्रम दाखविला आहे; चवथ्या भागांत सर्वात्मरूप परमेश्वराच्या उपासनेचा विचार करण्यांत आला आहे; आणि शेवटीं पांचवे भागांत केवल वस्तुस्थितिप्रकाश दाखविला आहे; अशा प्रकारचा हा पंचभागात्मक गुरुप्रसाद आहे. यांतील प्रत्येक मुख्य मुद्याचे समर्थनार्थ सच्छास्त्र आणि सज्जन यांचीं निवडक बलिष्ठ आणि युक्तियुक्त अशीं प्रमाणवचनें दाखल केलीं आहेत. त्याअर्थीं याचे आप्ततेविषयीं साशंक असण्याचें कारणच नाहीं. छापतांना यांत जे अगदीं ठळक दोष राहून गेले आहेत त्याबद्दल शुद्धिपत्र दिलें आहेच. पण अवान्तर काना, मात्रा, अनुस्वार, अस्पष्टाक्षरत्व इत्यादि बारीकसारीक कांहीं चुको आहेत, त्याबद्दल मात्र ग्राहकांनीं इतकें लक्ष पुरविण्याचें कारण नाहीं. आमच्या प्रणवप्रकाशापेक्षां याची भाषा पुष्कळच सोपी आहे. केवल विषयच कठीण असल्यामुळें क्वचित् दुर्बोधता वाटेल ती सह्य आहे. तथापि ग्राहकांनीं किंवा वाचकांनीं इतकें ध्यानांत ठेवावें कीं, जर हा प्रसादच आहे तर, याचें सेवनही आपल्या

अंतःकरणाच्या प्रसन्न, उत्सुक आणि शांत स्थितींत सावकाश आदर-पूर्वक करीत गेलें पाहिजे, असो. शेवटीं ज्या अनेकरूप परमेश्वराकार गुरुमूर्तींनीं हा संपूर्ण प्रसाद आमच्याकडून तयार करविला त्यांस एकवार अनन्य प्रणाम करून तो प्रसाद, ग्राहक किंवा भोक्ता ह्मणून त्यांच्याच रूपानें प्रकट असलेल्या सर्व अधिकारी साधुजनास आम्ही अर्पण करीत आहों, आपलाच आहे तेव्हां गोड लागलाच पाहिजे.

प्रस्तुत ग्रंथ छापवून प्रसिद्ध होण्यासंबंधानें ज्या इष्टमित्रांनीं अनेकविध साहाय्य केलें आहे त्यांचे आम्ही फारफार आभारी आहों.

पुणें, मिति कार्तिक शुद्ध १ शके १८२५. } केशव शास्त्री दामले.

शुद्धिपत्रक.

—:०:—

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
१९	१४	सासारिक	सांसारिक
४२	३	करून.	करून
४४.	६	ता	तो
४८	४	आत्मसंसुख	आत्मसंमुख
,,	७	मिळावा	मिळवा
८०	११	व्यस्त	व्यक्त
११८	४	एकावर	एकावर एक
१६४	२६	घ्यावा	द्यावा
१७२	१३	रमेणाय	रमणीय
,,	१९	असल्यामुळें	असल्यामुळें
१७४	९	स्फुरणाच्या	स्फुरणाऱ्या
१८६	४	अगदीं सारखा आहे	भिन्न नाहीं
१९०	४	भाळाभाव	भोळाभाव
२०५	४	माव	भाव
,,	१०	करी	करीं
	१६	साक्षात्काकडे	साक्षात्काराकडे
२१९	४	साक्षात्कारण	साक्षात्करण
२२९	११	मानकिस	मानसिक
२५२	६	आ धातु	हा धातु
,,	११	चैन्यप्रकाश	चैतन्यप्रकाश

अभिनंदन.

कर्तव्यकर्म म्हणून एका गोष्टीचा उल्लेख करणें अवश्य आहे, ती अशी— श्रीमंत रा. रा. रामराव कृष्ण जठार, मुमताजुद्दोला बहादूर, मुकाम लष्करग्वालियर, याणीं आपले अव्यक्तबोध आणि स्वानंदसाम्राज्य या ग्रंथांची एकेक प्रत आह्मांस नजर केली याबद्दल आम्ही त्यांचे आभार तर मानतोंच, परंतु विशेषतः आम्ही त्यांचें अभिनंदन करतों. पारमार्थिक विषयांचें ज्ञान संपादूं इच्छिणाऱ्या आधुनिक रुचीच्या लोकांस यांचे ग्रंथ ह्मणजे एकप्रकारचा मेवाच बनले आहेत असें आह्मांस वाटतें. एरवीं हें आह्मी सांगण्यापूर्वीच जिज्ञासु लोक त्यांचा आदर करीत आहेत यावरून आमच्या मताची पुष्टि मात्र होत आहे. ते आह्माविषयीं सर्व प्रकारें अत्यंत साभिमान आहेत हें अनुभवसिद्ध आहे; त्या अर्थी आम्ही त्यांचे एक अभीष्टचिंतक केवल आहों इतकें तरी म्हटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं.

केशव शास्त्री दामले.

अनुक्रमणिका.

प्रथम भाग.

विषयनिर्देश. पृष्ठांक.

द्वितीय भाग.

तृतीय भाग.

विषयनिर्देश. **पृष्ठांक.**

चतुर्थ भाग.

पंचम भाग.

अनुक्रमणिका संपूर्ण.

विज्ञापना.

—:•:—

सांसारिकस्थिति कितीतरी अनिश्चित व भयदुःखग्रस्त आहे असें एखादे वेळेस तरी या मनुष्याचे अंतःकरणास भासूं लागतें; पुढें ती अत्यंत नीरस आहे असें वाटून तो तिच्यापासून पराङ्मुख होऊं लागतो; आणि हळुहळु तात्विक विचार करण्याकडे त्याची प्रवृत्ति होत असते. अर्थात् या दृश्यभासाच्या पलिकडील कांहीं पारमार्थिक अव्यक्ततत्त्वाचा शोध करून त्यांत आपल्यास निश्चित समाधान मिळेल तर पहावें असा याच्या मनोवृत्तीचा कल असतो, असला एकप्रकारचा त्यास नाद लागून थोडासा तरी त्याबद्दल व्यासंग घडतो; आणि त्यायोगानें याची बुद्धि कांहीं एका निर्णयावर येऊन पोंचते; तो अंतरांत पक्कदशेस आला म्हणजे शब्दरूपानें बाहेर व्यक्ततेस येणारच; असा एक स्वाभाविक प्रकार आहे. अशा मार्गक्रमणांतच हा गुरुप्रसाद सिद्ध झाला आहे; असो. वास्तविक परमार्थ काय आहे हें निश्चित ठरविण्यांत आम्ही प्रमाण, युक्ति आणि विचारजन्य अनुभव, या तीन गोष्टी पुढें करून चाललों आहों. श्रद्धा तर प्रथम पाहिजे असें निरंतर आम्ही ह्मणतोंच; पण तिच्या आड होऊन वाटेल तें स्थापित करावें असलें धाडस आम्ही केलें नाहीं असें आम्हांस वाटत आहे. विचार करण्याची दिशा कदाचित् भिन्न असूं शकेल; परंतु विचारविषयभूत प्रमेयाचा जो तत्काल हृदयंगम अनुभव मिळाला पाहिजे, तो जर मिळेल तर मग विचारदिशाभेद दूषणीय वाटण्याचें कांहीं कारण नाहीं; येथील सर्व प्रकार अगदीं हिशेबी आहे. व्यावहारिक अनुभवानें पटणाऱ्या प्रमेयांपैकींच प्रस्तुत ग्रंथविषय आहे. निष्कारण आणि अतिरिक्त गूढता पुष्कळ अंशीं या ग्रंथानें काढून टाकिली आहे. क्वचित् प्रसंगीं बुद्धिमांद्यास्तवच केवळ कांहीं विचारांश प्रथमतः क्लिष्ट वाटतील. तथापि पुनरावृत्तिवशात् सर्व अर्थ सुबोध होतील यांत संशय नाहीं. सुशिक्षित, सहृदय आणि गंभीरस्वभाव अशा सुबुद्धिसंपन्न ग्राहकाचे ठिकाणीं यांतील सूक्ष्म आणि हृदयंगम अनेक विचारकौशलाचा मधुरिमा कांहीं तरी सद्भावच उत्पन्न करील अशी

आम्हांस बरीच आशा आहे. धार्मिक तत्त्वज्ञानाचे साम्राज्यावर आम्हां वैदिक-धर्मानुयायी लोकांचें वास्तविक स्वामित्व आहे असें समजणाऱ्या सर्व वर्णाश्रमी महाजनांस तरी या प्रसादाविषयीं थोडासा अभिमान वाटो असें शुभचिंतन आम्ही करीत आहों. एरवीं आपल्यास राष्ट्रीय सुख नाहीं, व्यापारसमृद्धिसुख नाहीं, यंत्रतंत्र-कलानैपुण्यांतील बहुमानपदाचें सौख्य नाहीं, आपला *धर्मध्वज फडकत नाहीं येथें सामाजिकसुधारणामहोत्सव नाहीं, अभिनव शास्त्रीय शोधचमत्कार आपल्यांत नाहीं, इत्यादि कारणांस्तव जे वरवर तरफडत असतील, झुरत असतील, नाटकी विलाप करीत असतील, त्यांना प्रस्तुत शांतरसपरिप्लुत हा प्रसाद मानवला नाही तर त्याबद्दल आम्ही खिन्न होत नाहीं; तथापि गुरुप्रसादीं कोणाच प्रमाद न घडावा अशी आमची एक नम्र प्रार्थना आहे; असो. प्रस्तुत ग्रंथास अनुक्रमणिका जोडण्याचें काम अगदीं मागाहून झालें, त्यामुळें जेथल्या तेथें विष-यांचे स्पष्ट नामनिर्देश मथळयाचे जागीं नमूद केले गेले नाहींत; त्याचप्रमाणें या प्रस्तुत ग्रंथांत आतियोग्य, निवडक, आणि बलिष्ठ अशींच प्रमाणवाक्यें जरी दिलीं आहेत, तरी तीं जेथून घेतलीं आहेत त्या ग्रंथस्थलांचा निर्देश आह्मां-कडून केला गेला नाहीं, याबद्दल ग्राहक लोक आह्मांवर अविश्वास करणार नाहींत असा आह्मी बळकट भरंवसा धरून राहिलों आहों. शेवटी हा श्रीगुरूंचा प्रसाद आहे, तो ग्राहकांपुढें ठेवण्याचे कामीं फक्त त्यानीं आम्हांला पुढें केलें आहे या-पलीकडे आमचा अधिकार कांहीं नाहीं. उदार आणि निर्भत्सर भक्तजन याचा स्वीकार करतात हें पाहून मात्र आम्हांस सहज अपरिमित आणि अमूल्य संतोष वाटेल; असो कळावें हे विज्ञापना.

श्रीगुरुचरणरजःकण

के. ना. दा. शास्त्री.

अथ

गुरुप्रसाद.

ॐसच्चिदानंदश्रीगुरुशेषशायिनारायणपरमेश्वर परब्रह्मात्मने नमः

प्रथम भाग.

आनंद तो आनंद! त्याच्यासारखें दुसरें काय प्रिय आहे! सर्वांनाच तो पाहिजे. किंबहुना तोच पाहिजे आहे. तो नित्य निरंतर असावा; आणि भय, शोक, दुःख व उद्वेग हे कधींच नसावेत, अशी प्रत्येकाची अंतर्यामापासून इच्छा आहे; पण या संसारांत त्या आनंदाचा बहुधा दुष्काळच आहे. तो हा संसार म्हणजे भयदुःखमय नाहीं असें सांगावयास प्रायः कोणीही तयार होणार नाहीं. यद्यपि या संसारांत एखाद्याच्या वांटयास असा कदाचित् कांहीं काल येतो, कीं, तेव्हां त्यास सामान्यतः वरून दिसण्यांत कोणतीच उणीव नसावी; त्यानें आपल्यापरी उत्तम मानलेली सुखाची सामग्री बहुतेक अनुकूल असावी; आणि तिच्या योगानें तो सुखीही असावा; त्या सुखांत, त्या आनंदांत तो अगदीं गर्क होऊन गेला असावा; तथापि ही त्याची सुखरूपता, नव्हे नव्हे, अभ्राची सावली किति वेळ टिकणार! एकदम कांहीं तरी अनिष्ट प्रसंग ओढवतो, आणि सर्व कांहीं विरस होऊन जातें! अथवा पुढें येणाऱ्या अनिष्ट प्रसंगाच्या भविष्यतेची तरी प्रतीक्षा कशासाठीं. पाहिजे, त्याची वाट

पहावयास नको. प्रत्यक्ष ज्यावेळीं हा आपल्यास तसा सुखिसा समजतो आहे, त्याच वेळीं त्याच्या अंतर्यामांत निर्भयता असते काय हें तपासून पहावें; त्यास तृप्तता वाटते काय याचा बारकाईनें शोध घ्यावा, आपल्या सुखाची चंगळ अशीच चालणार ही त्यास खात्री आहे काय याचा नीट छडा काढावा; म्हणजे आपल्यास कळून येईल, तेव्हां भ्रमाचा भोपळा फुटेल. सारांश, सुखाच्या भपकेदार आभासानें हा अगदीं जडमूढ होऊन गेलेला असतो, यामुळें त्यास आपली सुखरूपता भय, शोक, उद्वेग इत्यादिकांनीं अभिव्याप्त असूनही समजत नसते. अफूच्या वासानें तान्हीं मुलें जशीं गुंगून जातात, त्याप्रमाणें सुखाच्या नुसत्या वासावर ही मंडळी तर्र होऊन जाते. संसारांतील हालहवाल कशी आहे, किंवा संसार चालविणें कसें आहे, हें जर एखाद्या विवेकी मनुष्यास विचारलें तर तो असें सांगेल कीं, आसुडाचे आणि दांडक्याचे तडाखे खाऊन विव्हल झालेल्या व दिवसभर कष्ट करून मट्ट्यास आलेल्या मोटेच्या बैलाचे चरित्राप्रमाणें आहे. हें कांहीं एखाद्या कल्पित कादंबरींतील कोणा एका व्यक्तीचें वर्णन आहे असें नाहीं. घरोघर प्रत्येक समंजस मनुष्यास ह्या आमच्या उल्लेखाचा अहर्निश प्रत्यय आहे. नीट विचारदृष्टीनें शोध माल करावा, ह्मणजे ध्यानांत येईल. तेव्हां संसारसुखाच्या नावीं लागून हा जीव कसा अगदीं वेडा होऊन जातो आणि त्याबरोबरच तो आपल्यास भय, शोक, मोह, उद्वेग इत्यादिकांच्या दुश्छेद्य पाशांत कसा अडकवून घेतो, ह्या दोन्ही गोष्टींचें सविस्तर वर्णनच आह्मीं केलें पाहिजे असें नाहीं. तात्पर्य, मनास वाटेल तें आह्मी बरळत आहों असें उतावीळपणानें समजून आमच्या उल्लेखाचा तिरस्कार न व्हावा. खरोखर, निश्चिंत, निर्भय आणि अक्षय सुखरूपता वाटावी. असें ह्याच्या केवळ प्रापंचिक स्थितींत वाजपासीं

काय आहे? असा कोणाचा याला जोरदार पाठिंबा आहे? हा कशाच्या एवढ्या घमेंडींत बसला आहे? अन्न, वस्त्र, उदक यांची विपुलता; गृह, आराम, ग्राम, देश, राष्ट्र इत्यादिकांची निरंकुश स्वाधीनता; अगदीं मनाजोगी सुरक्षित संतति संपत्ति; प्रसंगवशात् सन्निध असलेल्या सहवासिजनांची स्पृहणीय आणि शाश्वत सुखसंगति; बहुविध विद्याप्रवीणता; मोठ्या अधिकाराची अखंड प्राप्ति; सर्वलोकमान्यता; सुदृढ आरोग्य; चिरजीवित्व; अनेककलाकुशलता; अक्षीणसौंदर्य; अतुलसौभाग्यसमृद्धि; पराक्रमशालिता; स्पृहणीयगुणाढ्यता; दिगंतव्याप्तविमलकीर्ति; अप्रतिबद्धभोगशक्ति; इत्यादि अमूल्य पदार्थराशींच्या प्रचंड संग्रहाची अविनाशी ऊब याजपाशीं आहे काय? छे हो! हे नुसते शब्दच तेवढे कोशांतून पाहावेत. या मनःकल्पित पदार्थांच्या प्राप्त्यर्थ जे कोणी त्यांच्या नादीं लागले, किंवा लागतील, आणि लागत आहेत, त्यांस मायादेवीनें आपलीं खेळणीं करून ठेवलीं आहेत, दुसरें काय म्हणायचें! एरवीं, आपापल्या जीवाचे समाधानाप्रीत्यर्थ जो कोणी ज्या मार्गाकडे वळतो, त्यास नांवें ठेवण्यास कोणालाही तितका अधिकार नाहीं;• तो हा संसार, संसाराच्याच केवळ दृष्टीनें, ज्यास मनोरम, सुखभरित, किंवा आनंददायक वाटत असेल, त्यांत दोषच वाटत नसेल तर त्यानें ह्या संसाराचा उपासक सुखेनैव व्हावें, तो तसा असतोच; तो आमच्या अनुज्ञेची थोडीच वाट पाहणार! तथापि हा संसार भयंकर आणि शोकदायक आहे असेंच अनेक शास्त्रें आणि शास्त्रकार त्याचप्रमाणें अत्यंत विश्वसनीय, निष्पाप व परम अनुभवी असे प्रत्यक्षद्रष्ट किति तरी महापुरुष सांगून राहिले आहेत. तेव्हां ज्यास-हा संसार तसा वाटतच नाहीं, उलट तो रमणीय, मोहक व सुखपरिपूर्ण आहे असेंच वाटतें, त्यास, रात्रीच्या वेळीं दिव्याभोंवतीं पिरटचा घालून घालून सेवटीं

प्राणास मुकणारे बिचारे पतंगच समजावें कीं काय न कळे! असो, हा प्रकार पाहून भगवान् श्रीकृष्ण असें सांगतात कीं,

अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम् ॥

म्हणजे हा लोक, हा दृश्यमान प्रपंच, सर्वथा सुखशून्य असून जर हे जीवा! त्यांत तूं सांपडला आहेस, आणि जीवितही क्षणभंगुर आहे, तर तूं माझें अर्थात् परमेश्वरपदाचेंच भजन करावेंस. या आज्ञेचें अक्षरशः अनुसरण करणारा, कारण त्या ह्या संसारांतील अनेक प्रकारच्या अनंत क्लेशांनीं, भयांनीं, उद्वेगांनीं आणि शोकमोहांनीं व्यापून गेलेला असा कोणी एक जीव, कसा उच्चस्वरानें विलाप करीत आहे तो ऐकूं या. तो म्हणतो "मी निरंतर सुखरूप होईन काय? तसा होण्याची मला कधीं तरी पात्रता येईल काय? अखंड सुखरूप होण्याचीं तीं साधनें तरी मला कोणी समजवून देईल काय? कोणी तरी येऊन माझें समाधान करील काय? माझ्या गळ्यांत पडलेला हा भयदुःखमय प्रपंच आतां कसा दूर होणार? याचें मूल कारण काय असावें? याच्या कचाटींतून मला दुर्बळाला कोण सोडवील! पहा याचा कसा अभेद्य पाश तो! मी यांतून आतां मुक्त होणार नाहींच काय? अशा दुस्तर विवंचनेंत पडलेल्या माझ्या जीवास निश्चित, निर्भय आणि निरंतर सुखरूप होण्याची कांहीं सोय या जगांत नाहींच काय? सर्वभक्षक उग्र काळाच्या महाभयानें आक्रान्त करून सोडलेल्या या मृत्युलोकांत माझें कोण रक्षण करील? देवा! कोणी तरी मला अखंड आनंदाचा मार्गदर्शक भेटो, आणि या जन्ममरणभयांतून मला मुक्त करो." अशा प्रकारचे हृदयद्रावक उद्गार हा काढतो आहे, तों, इतक्यांत कोणी एक महापुरुष याच्या समोरच उभा असा दृष्टीस पडला. तो कोठून कसा आला वगैरे त्यास कांहींच उमगलें नाहीं. त्यामुळें हा अगदीं चकित

होऊन स्तब्ध झाला. याच्यानें मुळींच बोलवेना, अशी याची स्थिति पाहून त्या महापुरुषानें एकवार कृपादृष्टीनें त्याच्याकडे अवलोकन केलें, आणि नंतर या कष्टी झालेल्या जीवास तो महापुरुष असें म्हणाला कीं,

तुझा सर्व विलाप माझे कानीं आला; तुझा उद्देशही मला सर्व समजला; त्याअर्थी तुझें कांहीं समाधान होईल तर पहावें म्हणून माझें अंतःकरण अत्यंत उत्कंठित झालें आहे. तेव्हां ऐन मुद्याची गोष्ट जेवढी आहे, तेवढी मी तुला अगदीं क्रमानें सांगणार, हिशेब तेवढा यथामति बरोबर मिळवून देईन. जें बोलेन तें अगदीं रोख आणि चोख. मी जें सांगणार आहें तें सच्छास्त्रांतील अगदीं सारभूत, अगदीं सोलीव रहस्यच तें आहे. अगदीं हडसून खडसून उघड समजेल अशा रीतीनें तें मी तुला सांगेन, अवांतर पूर्वपक्ष आणि उत्तरपक्ष करणें मला नको. सच्छास्त्र आणि पुण्यमूर्ति अनुभवी महापुरुष, यांचीं प्रमाणभूत निर्दोष वचनें प्रसंगानुरूप तात्पर्यरूपानें स्पष्टार्थ सांगेन. एकंदरींत माझे हृदयांत जें समाधान आहे, तेंच मी तुझ्यापुढें ठेवितों, तुला तें रुचेल आणि संग्राह्य वाटेल तर घे, आणि कृतकृत्य ऐस. आतां ही प्रस्तावना पुरी करून एकदम वक्तव्य विषयाकडे मी वळतों, तुझें पूर्ण अवधान मात्र असावें.

आमचा असा पूर्ण अनुभव आहे कीं, ज्या कोणा जीवास या प्रपंचांत कोणत्याही प्रकारचें निश्चित समाधान नाहीं, भय, दुःख आणि उद्वेग यांनीं ज्याचें हृदय व्यापून गेलें आहे, प्रपंच भयदुःखरूपच आहे, असा ज्याचा दृढ निश्चय होऊन त्याविषयीं ज्याला वीट आला असेल; अर्थात् त्याविषयीं जो विरक्तचित्त झाला असेल; पण ज्याला खरें खरें निरंतरचें गोड समाधान अक्षय्य हवें असेल; केवळ निष्प्रपंच असा स्वतंत्र आनंदमात्रच नित्य निरंतर

असावा अशी अगदीं बेंबीचे देठापासून ज्याची प्रार्थना असेल; त्याच्या करितां ज्याचे हृदयास एकसारखी तळमळ लागून राहिली असेल, त्याकरितां जो झुरणीस लागला असेल; त्यानें निराश होण्याचें कांहीं कारण नाहीं, अर्थात् परमेश्वराच्या दरबारांतून अशा जीवाकरितां केवढी मोठी व्यवस्था ठेवण्यांत आली आहे हें तुझ्या ध्यानांत आतां आलेंच पाहिजे. असो, पूर्वोक्त प्रकारच्या समाधानाविषयीं अत्युत्कट इच्छा होणें ह्मणजे शुद्ध परमार्थाचीच 'इच्छा होणें असें आहे; ह्मणजे भयदुःखरूप अशा संसारांतून मुक्त होऊन अखंड सुखरूप, अखंड आनंदरूप होणें हाच मुख्य शुद्ध परमार्थ आहे. परम पुरुषार्थ जो मोक्ष, तोही याहून आणखी कांहीं वेगळा सर्वथा नाहीं. मोक्ष हा शब्द संस्कृत आहे. सच्छास्त्राच्या परिभाषेंतील तो एक आहे; परंतु त्यांतील तात्पर्याचा उल्लेख करण्यांत आंलाच आहे, तेव्हां प्रसंगवशात् आम्हीं त्याचा प्रयोग केल्यास आतां अर्थासंबंधानें कांहीं अडचण राहणार नाहीं. मोक्ष ह्मणजे ब्रह्मभाव. मोक्ष ह्मणजे निरतिशय आनंदघन, द्वैतभयरहित, सर्वविपर्यासशून्य अशी जी अखंड स्वयंप्रकाशमान स्वस्वरूपस्थिति, तिलाच मोक्ष असें ह्मणावें. हें जें मोक्षाचें लक्षण किंवा स्वरूप आह्मीं सांगितलें, यांत स्वस्वरूपस्थिति हाही एक शब्द कांहींसा दुर्बोध वाटेल, तथापि त्यांतील भावार्थ इतकाच कीं, ह्या स्थितींत जीवाला अगदीं तात्विक स्वातंत्र्य असतें, तें प्रत्यक्ष असतें. अर्थात् आपण आपल्या ठिकाणीं आपल्या तात्विक अपरोक्ष रूपानें अखंड सुखरूप असणें. ही स्थिति अद्वैतरूप असल्यामुळें, तिला पोंचलेल्या सिद्ध पुरुषास कोणाचेंही भय उरत नाहीं. येथें काळाचेंही भय नाहीं. मृत्यूचीच येथें चटणी होते. खरोखर अशी स्थिति होणें किंवा असणें हाच गुरुप्रसाद. हेंच मुख्य महाफल. हेंच जीवितसाफल्य. हाच परमपदलाभ. हाच कैवल्य-

धामनिवास. तात्पर्य म्हणून येथें इतकें पक्कें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, खरमरीत भूक लागल्यावांचून जशी भोजनाची गोडी नाहीं, तहानेनें कासाविशी झाल्यावांचून जशी गंगोदक प्राशनाचीही किंमत नाहीं. प्रखर ऊन्ह लागल्यावांचून जशी सावलीची प्रतिष्ठा वाटत नाहीं. त्याप्रमाणें प्रपंचांतील क्षणभंगुरता भासून चित्त उदास झाल्याखेरीज व अतितीव्र दुःखाग्नीच्या तापांनीं हृदय संतप्त झाल्यावांचून, या परमार्थसुखाविषयीं, या मोक्षसुखाविषयीं, खरी लालसाच उत्पन्न होत नसते. केवल बुद्धिमत्ता या दृष्टीनें या परमार्थसुखाच्या किंवा मोक्षविद्येच्या शास्त्राकडे एखाद्याची प्रवृत्ति झाली तरी त्याला तो निष्प्रपंच मोक्षपर्यवसायी असा ब्रह्मानंद होत नसतो. आणि ज्याला खरी लालसा उत्पन्न होते, त्यास मोक्षमार्गदर्शक खरा श्रीगुरुही भेटतो, तो श्रीगुरु वैकुंठांत असो, किंवा कैलासांत असो, अथवा हिमालयाच्या थंडगार गुहेंत तो महात्मा असो, तेथून थेट तो या मुमुक्षूचे घरीं, नव्हे, हृदयगव्हरींच तत्काळ प्रकट होतो; आणि या मुमुक्षु जीवाचें कार्य होतें, याची एकदाची तळमळ संपते.

आतां अशा त्या मोक्षाचा लाभ कोणत्या एका अचुक साधनानें होतो, हें कळून घेण्याची आकांक्षा सहज उद्भवणारच. तिचा परिहार असा कीं, **मोक्षप्राप्तीचें अगदीं मुख्य आणि सर्वोत्कृष्ट अंतरंग साधन म्हटलें म्हणजे आपल्याच तात्विक स्वरूपाचें एक शुद्ध ज्ञान हेंच होय, असा वेदशास्त्रादिकांचा निश्चल सिद्धान्त आहे.** हा आमचा उल्लेख ज्याच्या त्याच्या स्वानुभवानें पुढें पटेतोंपर्यंत आप्तवचनावर विश्वास म्हणजे श्रद्धा असणें अत्यंत आवश्यक आहे. सोपपत्तिक यथार्थ उपदेश करणारें जें सच्छास्त्र, किंवा त्यास अनुसरून उपदेश करणारे जे श्रीगुरु त्यांसच येथें आप्त असें समजावें. "आत्मीय तत्वज्ञानानेंच अखंड आनंदरूप मोक्ष

प्राप्त होतो" असें प्रतिपादन करणारीं आप्तवचनें प्रमाणार्थ आम्हांस किति तरी दाखवितां येतील. तथापि त्यांपैकीं शेलकीं शेलकीं, थोडीशीं मूलभूत वैदिकवचनें आणि थोडकिशीं स्मृतिवचनें येथें आम्ही मुद्दाम नमूद करतों.

श्रुतं ह्येव मे भगवद्दृशेभ्यस्तरति शोकमात्मवित् ॥ सोऽहं भगवः शोचामि त मा भगवान् शोकस्य पारं तारयतु ॥ तमेव विदित्वा अतिमृत्युमेति नान्यः पंथा अयनाय विद्यते ॥ तमात्मस्थं येऽनुपश्यंति धीरास्तेषां शांतिः शाश्वती नेतरेषाम् ॥ एतध्द्येवाक्षरं ज्ञात्वा यो यदिच्छति तस्य तत् ॥ यस्तु विज्ञानवान् भवति समनस्कः सदा शुचिः ॥ स तु तत्पदमाप्नोति यस्माद्भूयो न जायते ॥ यस्त्वविज्ञानवान् भवत्यमनस्कः सदाऽशुचिः ॥ न स तत्पदमाप्नोति संसारं चाधिगच्छति ॥ निचाय्य तन्मृत्युमुखात्प्रमुच्यते ॥ एवं मुनेर्विजानत आत्मा भवति गौतम ॥ ब्रह्मविदाप्नोति परम् ॥ यो वा एतदक्षरं गार्ग्यविदित्वाऽस्माल्लोकात्प्रैति स कृपणः ॥ अनन्दा नाम ते लोका अन्धेन तमसा वृतास्ताँस्ते प्रेत्याभिगच्छन्त्यविद्वांसोऽबुधो जनाः ॥ असुर्या नाम ते लोका अन्धेन तमसा वृतास्ताँस्ते प्रेत्याभिगच्छन्ति ये के चात्महनो जनाः ॥ अथैतदक्षरं यो गार्गि विदित्वाऽस्माल्लोकात्प्रैति स ब्राह्मणः ॥ मैत्रेय्यात्मनि खल्वरे दृष्टे श्रुते मते विज्ञाते इदं सर्वं विदितम् ॥ एतद्यो वेद निहितं गुहायां

सोऽविद्याग्रंथिं विकिरतीह सोम्य ॥ आत्मानं चेद्विजानीयादयमस्मीति पूरुषः॥ किमिच्छन्कस्य कामाय शरीरमनुसंज्वरेत् ॥ भिद्यते हृदयग्रंथिश्छिद्यंते सर्वसंशयाः ॥ क्षीयंते चास्य कर्माणि तस्मिन्दृष्टे परावरे ॥ यथा नद्यः स्यन्दमानाः समुद्रेऽस्तंगच्छन्ति नामरूपे विहाय ॥ तथा विद्वान्नामरूपाद्विमुक्तः परात्परं पुरुषमुपैति दिव्यम् ॥ तरति शोकं तरति पाप्मानं गुहाग्रंथिभ्यो विमुक्तोऽमृतो भवति ॥ तमेवं विद्वानमृत इह भवति । इह चेदवेदीदथ सत्यमस्ति । ब्रह्म वेद ब्रह्मैव भवति । आत्मविद्यः स इदं सर्वं भवति। आनंदं ब्रह्मणो विद्वान्न बिभेति कुतश्चन । अध्यात्मयोगाधिगमेन देवं मत्वा धीरो हर्षशोकौ जहाति ॥

हीं सर्व वचनें चारी वेदांतील आहेत; तशांतही भगवान् शंकराचार्यांसारख्या महापुरुषांनीं ज्या निरनिराळ्या उपनिषत्प्रकरणांवर भाष्य लिहिलें आहे त्या निवडक उपनिषदांतील हीं वचनें आहेत. या सर्व वचनांचें तात्पर्य अगदीं एक आहे. मात्र एकाच अभिप्रायाचीं अनेक वाक्यें आहेत म्हणून कंटाळूं नये. आम्ही त्यांचा अर्थ सहज कळेल असाच सांगतों.

म्हणजे कोणी एक मुमुक्षु जीव ब्रह्मवेत्त्याकडे शरण जाऊन त्यास अशी प्रार्थना करतो कीं, महाराज! मीं आपल्यासारख्या थोर पुरुषांपासून असें ऐकिलें आहे कीं, आत्मवेत्ता भयशोकमय आणि जन्ममरणरूप अशा संसारसागराप्रत तरून जातो; आणि ज्या अर्थी मी त्यांत बुडत आहें, शोक पावत आहें त्या अर्थी तशा मला याच्या पार तारून न्या, आपण समर्थ आहां. तात्पर्य, आत्मवेत्ताच शोकसं-

ज्ञित संसारसागराप्रत तरून जातो असें ह्मटल्यानें ज्यास आपल्या तात्त्विक आत्मस्वरूपाचें शुद्ध ज्ञान आहे, तोच एक तरतो, आणि जो तरतो तो एक आत्मतत्त्वज्ञानरूप साधनानेंच तरतो, ह्या प्रसिद्ध आत्मतत्त्वस्वरूपासच जाणून, ह्मणजे जाणलें किंवा अनुभविलें तरच हा जीव मृत्यूचें अतिक्रमण अवश्यमेव करतो. अर्थात् येथें मृत्यु ह्मणजे भयदुःखमय जन्ममरणरूप असा संसारसागर असाच अर्थ आहे. मोक्षप्राप्तिविषयीं आपल्या तात्विक स्वरूपास केवळ जाणण्यावांचून दुसरा कोणताही मार्ग ह्मणजे साधन नाहींच नाहीं. या आपल्या हृदयस्थित प्रसिद्ध आत्मस्वरूपास जे सतत अवलोकन करतात, अर्थात् त्याचा अनुभव घेतात, त्यांसच नित्य निरंतरची शांति मिळते; इतरांस नाहींच नाहीं. यावरून असें ध्यानांत आलें पाहिजे कीं, अशी नित्य निरंतरची शांति ह्मणजे नित्यमुक्तस्थिति प्राप्त होण्यास आत्मतत्वज्ञान हेंच एक साधन आहे. या निर्विकार अविनाशि आत्मतत्त्वास जो जाणून राहील, त्यास मग पाहिजेल तें त्याचेंच आहे. यांतील तरी अभिप्राय हाच कीं, आपल्यास सर्वथा प्रियतम असलेल्या निरंतरच्या समाधानपूर्वक आनंदांत उणें न पडण्यास आपलें एक तात्त्विक व दृढ आत्मतत्त्वज्ञानच निर्वाणीचा उपाय आहे. ज्या पदाची एकदा प्राप्ति झाली तर तेथून पुनः च्युत होऊन जन्ममरणादि दुःखरूप संसारास येणें संपतें, तें पद म्हणजे आपलें शुद्ध आत्मतत्त्वच होय. पण अशा या पदाची प्राप्ति कोणास ? तर अर्थात् जो त्याविषयीं निःशंकज्ञानसंपन्न होईल त्यासच. तोच मोठा प्रबुद्ध, तोच सहृदय, आणि तोच पवित्र. आत्मतत्त्वज्ञानाचा असा हा प्रभाव आहे, असें जाणून जो कोणी हें ज्ञानधन आपले गांठीस जोडणार नाहीं, तो मूर्ख, तो केवळ पाषाण, तो पापाचा पुतळाच, तो अमंगलाची

मूर्तिच. त्यास तें अखंडानंदरूप समाधानपद कसें मिळणार! त्याच्या कपाळीं पुनरपि जननं पुनरपि मरणं हेंच ठरलें आहे. या शाश्वत आत्मतत्वस्वरूपाचा परिचय किंवा ज्ञानरूपानें संचय केला तरच मृत्यूच्या मुखांतून सुटका आहे; तरच संसारांतून मुक्तता होणार. हा तत्वस्वरूप आत्मा सर्वत्र सर्वदा आहे हें खरें; पण जो ज्ञानानें त्यास स्वाधीन करून घेईल, म्हणजे त्यास तसा अनुभवील, त्याचा तो आहे, त्याचा तो होतो. अर्थात् जाणण्यानें आत्मतत्वाची प्राप्ति; आणि असा जो आत्मलाभ, तो अखंडानंदाचाच लाभ होय. अत्यंत महत् अशा ब्रह्मसंज्ञित आत्मतत्वास जो जाणतो, तो सर्वोत्कृष्ट आनंदरूप अक्षय समाधानाच्या धामास पावतो. अर्थात् ब्रह्मानंदपदाच्या प्राप्तीस आत्मतत्वज्ञान हेंच एक निर्दोष साधन आहे. एके प्रसंगीं याज्ञवल्क्य ऋषि, गार्गिनामक ब्रह्मचारिणीस असा उपदेश करतात कीं, हे गार्गि, जो कोणी या आपल्या अविनाशी अशा तात्विक आत्मस्वरूपास न जाणतां मरून या लोकांतून जातो, तो कृपण असें समजावें; तो करंटा, तो दैन्यदुःखाचाच वांटेकरी होतो. जे आत्मतत्त्वज्ञानसंपन्न होत नाहींत, अशा रीतीनें जे आत्महत्याच करतात, त्यांस मरणोत्तर भयदुःखमोहप्रपूरित अशीच गति मिळते. जडमूढ, शोकसंकुल अशा शोचनीय अमंगल जातींत त्यांची उत्पत्ति होते. आणि जो कोणी या आत्मतत्त्वस्वरूपास जाणून या लोकांतून, या दृश्यभासरूप जगतांतून निघून जातो, म्हणजे त्यावरील सत्यत्वबुद्धि ज्याची उडून जाते, त्यास पाहून जो भुलत नाहीं, त्यासच ब्राह्मण म्हणावें, तोच ब्रह्मानंदाचा स्वामी होय. भावार्थ हा कीं, जिवंत आहों तोंपर्यंत या आत्मतत्वस्वरूपास जाणून घेतलें नाहीं तर पुढेंही सर्वदा दुःखरूपच राहावें लागणार; आणि त्यास जाणलें तर अखंड सुखरूपच असतां येईल. अर्थात् तें दैन्यदुःखरूप

कार्पण्य जाऊन अखंड सुखरूप अशा ब्राह्मण्याचे प्राप्तीस आत्मतत्वाचें ज्ञान हेंच एक साधन आहे. तेच याज्ञवल्क्य, आपल्या मैत्रेयीनामक पत्नीस असें सांगतात कीं, हे मैत्रेयि, आपल्या आत्म्याच्या तात्विक स्वरूपाचें श्रवण केलें असतां, त्याचें मनन केलें असतां, त्याचें दर्शन घेतलें असतां, तद्विषयीं दृढ अपरोक्ष ज्ञान मिळविलें असतां इतर सर्व कांहीं कळून चुकलें म्हणजे अजमावलें असें आहे. अर्थात् आत्मतत्वज्ञानापुढें इतर सर्व ज्ञान तुच्छ आहे. सर्व भेदज्ञानें मिथ्या ठरतात. सच्छिष्यास श्रीगुरूंचा असा उपदेश कीं, हे चंद्रवत्प्रियदर्शना, जो कोणी या देहांत हृदयामध्यें निधान म्हणून गुप्त असलेल्या तात्विक आत्मस्वरूपास जाणतो, तोच अज्ञानजन्य भयदुःखरूप संसारपाशबंधाचा उच्छेद करण्यास समर्थ होतो. तात्पर्य, संसारपाश तुटण्यास स्वस्वरूपतत्वज्ञान हेंच असलें पाहिजे. आत्मतत्वज्ञान हें दुर्लभ तर खरेंच; पण जर कोणी जीव हातांतील आंवळ्याप्रमाणें अगदीं टळटळीतपणें 'हा तो माझा तात्विक आत्मा' असें म्हणून छातीला हात लावून त्याचा अपरोक्ष साक्षात्कार करून राहील, त्याचा निःशंक प्रत्यय अंगांत उभा वागवील, तर मग त्यानें इच्छा करण्यासारखें त्यास अप्राप्त असें उरणार तरी काय आहे? कीं, ज्याकरितां ह्या शरीरपरत्वें त्यास तापत्रय सोसणें पडेल. अर्थात् ज्यायोगानें सर्व कामनाच नष्ट होतात, सर्व संताप उपशमास पावतात, असें साधन शोधूं गेल्यास एक आत्मतत्वज्ञान हेंच आहे. अज्ञानमूलक भ्रमात्मक सर्व मोहपाश तुटतो, सकल संशय विच्छिन्न होतात, अखिल कर्मकष्टांचा क्षय होतो, या सर्व गोष्टी घडतात, पण जर सर्वोत्कृष्ट अशा त्या प्रसिद्ध आत्मतत्वस्वरूपाचें दर्शन झालें तर! म्हणजे सर्वबंधनांचा उच्छेद, संशयांचा निरास आणि कष्टरूप कर्मांचा क्षय, या सर्व गोष्टी घडून येण्यास आत्मीय

तत्वस्वरूपाचा यथार्थ अपरोक्ष साक्षात्कारच एक अनुपम्य उपाय आहे. भिन्न भिन्न प्रदेशांतून वाहत जाणाऱ्या नद्या आपापलीं पृथक् पृथक् नामरूपें सुटून ज्याप्रमाणें समुद्रामध्यें त्याच्याशीं समरसता पावतात, त्याप्रमाणें जर हा जीव आत्मीय स्वरूपतत्वज्ञानानें संपन्न असेल तर तो या नामरूपात्मक प्रपंचांतून विमुक्त होऊन त्या उज्ज्वल तेजोरूप परात्पर सर्वेश्वरपदास पावतो. सारांश हा सर्व आत्मतत्वज्ञानाचा प्रभाव आहे. तो ज्याच्या ठिकाणीं प्रकट होतो, तो नित्य शुद्ध आनंदीं आनंदरूप होतो. अर्थात् असें होण्यास आत्मतत्वज्ञान हेंच एक निरंकुश साधन आहे. आत्मतत्ववेत्ताच शोकरूप पापरूप संसारसागरास तरून जातो; तो आशापाशांतून मुक्त होतो, तो अखंड आनंदरूप अशा मोक्षपदास पावतो. सर्वांतर्यांत असें आपलें ईश्वरीय तात्विक स्वरूपाचें दृढ अपरोक्ष ज्ञान ज्यास असतें, तो साधक जीव वर्तमान देहामध्येंच जिवंत असून शोकमोहरहित अखंडानंदरूप मुक्तिपदास पावतो. आत्मतत्वज्ञान दुर्लभ जरी आहे, तरी एकवार जिवंत असे तोंपर्यंत जर या जीवास आपल्या तात्विकस्वरूपाचें ज्ञान झालें, तर त्यास तत्काल पुनः संसारावृत्तिरहित अशा नित्यानंदरूप कैवल्यपदाची प्राप्ति होते. जो आपले तात्विक व निरतिशयमहत् अशा स्वरूपास जाणतो, तो अक्षय आनंदरूप आणि प्रियतम असा सर्वांचा आत्माच होतो. जो आत्मतत्वास जाणतो तो हें सर्वच होतो; अर्थात् त्यास सर्व कांहीं मिळतें. आपल्या तात्विक आनंदरूप आणि परममहत् अशा सूक्ष्म अखंड अभिन्न स्वरूपास जो जाणील त्यास कोणापासूनही भय नाहीं. अर्थात् भयदुःखशोकमोहवार्जित अखंड आनंदरूप आणि सहज शांत अशा मोक्षपदाची प्राप्ति होण्याला आपल्यास आपल्या तत्वस्वरूपाचें ज्ञान हेंच साधन आहे. आतां जिज्ञासु जगद्गुरु भगवान्

शंकराचार्यादिकांनीं भाष्य लिहून ठेविलें आहे, त्या विश्वविख्यात भारतमहापुराणांतर्गत श्रीमद्भगवद्गीतेंत श्रीकृष्ण परमात्मा सर्व जनांच्या शोकमोहाचे परिहारार्थ जो उपाय सांगत आहेत तो असा कीं,

अपि चेदसि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः ॥
सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि ॥ १ ॥
यथैधांसि समिद्धोऽग्निर्भस्मसात्कुरुतेऽर्जुन ॥
ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते तथा ॥ २ ॥
न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ॥
ज्ञानं लब्ध्वा परां शांतिमचिरेणाधिगच्छति ॥ ३ ॥
बुद्धौ शरणमन्विच्छ कृपणाः फलहेतवः ॥
बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते ॥ ४ ॥
यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते ॥
बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागताः ॥ ५ ॥
इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः ॥
सर्गेऽपि नोपजायंते प्रलये न व्यथांति च ॥ ६ ॥
यो मामेवमसंमूढो जानाति पुरुषोत्तमम् ॥
स सर्वविद्भजति मां सर्वभावेन भारत ॥ ७ ॥
क्षेत्र-क्षेत्रज्ञयोरेव-मंतरं ज्ञानचक्षुषा ॥
भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुर्यांति ते परम् ॥ ८ ॥
एवं यो वेत्ति पुरुषं प्रकृतिं च गुणैः सह ॥
सर्वथा वर्तमानोपि न स भूयोऽभिजायते ॥ ९ ॥
यज्ज्ञात्वा न पुनर्मोहमेवं यास्यसि पांडव ॥
येन भूतान्यशेषेण द्रक्ष्यस्यात्मन्यथो मयि ॥ १० ॥
ज्ञानी त्वात्मैव मे मतम् ॥ ज्ञानवान्मां प्रपद्यते ॥
सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शांतिमृच्छति ॥ ११ ॥

गतासूनगतासूंश्च नानुशोचंति पंडिताः ॥
अभितो ब्रह्मनिर्वाणं वर्तते विदितात्मनाम् ॥ १२ ॥

अशा किती तरी वाक्यांनीं भगवान् श्रीकृष्ण, सरळ अंतःकरणाच्या, जिज्ञासु आणि मुमुक्षु अशा अधिकारी जीवास असें सांगतात कीं, बाबारे, तूं सर्व पापी जीवांपेक्षां कितीही मोठा पापी असलास तरी त्या दुःखरूप पापसमुद्रास एका फक्त आत्मतत्वज्ञानाच्या नौकेनेंच उत्तम रीतीनें तरून जाशिल. चेतविलेला अग्नि जसा काष्ठांचें भस्म करतो, त्याप्रमाणें आत्मतत्वज्ञानरूपी अग्नि सर्व कष्टरूप कर्मराशींचें भस्म करतो. त्या ह्या आत्मतत्वज्ञानासारखें शुद्ध करणारें पवित्र म्हणजे निर्दोष साधन दुसरें कांहींच या जगांत दिसत नाहीं; या ज्ञानाची प्राप्ति झाली तर हा जीव तत्काल परा शांतीला म्हणजे अखंडानंदरूप मुक्तावस्थेला पावतो. याकरितां तें हें आत्मतत्वज्ञान हीच एक गति आहे, हेंच रक्षक आहे. हीच एक निवाऱ्याची सुरक्षित जागा आहे, असें मनांत आणून आपल्यास तें आत्मतत्वज्ञान अवश्य असावें अशी निरंतर इच्छा वाटावी, त्याचा शोध करावा; आणि तत्परायण असावें. आत्मतत्वज्ञानाहून इतर जीं कर्मादिक सर्व साधनें, तीं कृपण आहेत ह्मणजे पामर आहेत, अर्थात् तुच्छ आहेत. तीं यास कृतार्थ करण्यास समर्थ नाहींत; तशीं साधनें करणारे ते दीनच राहतात, त्यांची तृष्णा कधीं शांत होत नाहीं. आत्मतत्वज्ञाता, पाप आणि पुण्य या दोहोंच्या पलिकडे जातो, अर्थात सर्वथा दुःखरूप अशा द्वैतजालांतून तो मुक्त होतो. या आत्मतत्वज्ञानाची अशी कांहीं मौज आहे कीं, जर याची एकदा प्राप्ति झाली तर पुनश्च समजून घेण्यासारखें येथें कांहींच उरत नाहीं. या आत्मतत्वज्ञानरूपी तपानें अनेक जीव पवित्र होऊन परमात्मपदास पावतात. अर्थात आत्मतत्वज्ञान हेंच भगवत्पदप्राप्तिविषयीं परम साधन आहे. या

आत्मतत्वज्ञानाचे आश्रयानें वस्तुतः भगवंताच्या सायुज्यमुक्तीस जीव पावतात. म्हणजे जगदुत्पत्तिकालीं त्यांस जन्मसंकट नाहीं, आणि जगताच्या प्रलयकालीं त्यांस मरणसंकटही नाहीं. जो आपल्या पारमेश्वरी तत्वस्वरूपास निःसंशयपणें आणि निर्भ्रमपणें जाणतो, तोच सर्ववेत्ता; आणि त्यासच सर्वप्रकारें परमात्मभजन घडतें. जे कोणी ज्ञानदृष्टीनें क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांतील अंतर आणि जड प्रकृतीपासून आपली अलिप्तता अर्थात् मुक्तता जाणतात, तेच परमआनंदरूप आणि सर्वातीत अशा परतत्त्वास पावतात. जो कोणी गुणांसह प्रकृतीस आणि चैतन्यरूप पुरुषतत्वास जाणतो, तो कोणत्याही रीतीनें असला तरी पुनश्च दुःखरूप जन्ममरणसंकटास पावत नाहीं. ज्या ज्ञानाचे योगानें हें सर्व भूतमय जगत् आपल्यावर म्हणजे आपल्या परमात्मवस्तुस्थितीवर कल्पित आहे असें दिसूं लागतें, तें ज्ञान प्राप्त झालें असतां पुनः कधीं मोह व्हावयाचा नाहीं. आत्मतत्ववेत्ता हा तर भगवंताचाही आत्मा. अर्थात् जो आत्मतत्वज्ञानसंपन्न, तोच भगवद्रूपास पावतो. एकंदरींत सर्वभूतांना अत्यंत प्रियतम, अत्यंत जिवलग जो आत्मा, त्यास तत्वतः जाणलें तर हा जीव शांतीस म्हणजे मोक्षपदास पावतो. आत्मीयतत्वज्ञानपंडितांस कधींही असल्यानसल्याबद्दल म्हणजे झाल्यामेल्याबद्दल शोक वाटत नाहीं. सारांश, आत्मतत्वज्ञानावांचून शोकाचा परिहार होणार नाहीं. त्यावांचून अखंड आनंदरूप मोक्षाचा लाभ नाहीं. आत्मतत्वज्ञानावांचून कृतकृत्यता नाहीं. आत्मतत्वज्ञानावांचून दुसरा कोणीच खरा तारक नाहीं. त्यावांचून सद्गति नाहीं, त्यावांचून शांति नाहीं, आत्मतत्वज्ञानावांचून तात्विक समाधानही कोणास मिळणार नाहीं. ज्यांनीं आपलें तात्विक स्वरूप जाणलें, त्यांना तर अखंड आनंदरूप ब्रह्मसंज्ञित असें शांत आणि शाश्वत सौख्य सर्वभर असतें. जीवास

केवल अखंडानंदरूप नित्यमुक्तिपदाचा लाभ एका आत्मतत्वज्ञानापासूनच होतो. असो, प्रतिज्ञा केल्याप्रमाणें साक्षात् वेदपुरुषांचीं वाक्यें आणि जगद्गुरु श्रीकृष्ण भगवंताचीं वाक्यें प्रमाणार्थ दाखवून, अखंड आनंदरूप आणि अचल शांतिरूप जें अक्षय्य व निःसीममधुर असें समाधानामृत हेंच परमपुरुषार्थरूप मोक्षपद आहे असें प्रस्थापित करून त्याचें खरें खरें सर्वोत्कृष्ट अंतरंग साधन, आपल्यास आपल्या तात्विक स्वस्वरूपाचें दृढ अपरोक्ष शुद्ध ज्ञान हेंच एक आहे. असाही निर्मूल निर्णय अनादिसिद्ध आहे तो उल्लेखित झाला. आतां मोक्षप्राप्तिविषयीं आत्मतत्वज्ञानाहून इतर साधनें किती अयोग्य अर्थात् तिरस्कार्य आहेत याबद्दलचीं प्रमाणभूत वचनेंही येथें सांगणें अवश्य वाटतें. तीं सर्वमान्य प्रमाणवचनें अशीं कीं,

प्लवा ह्येते अदृढा यज्ञरूपा एतच्छ्रेयो ये ऽभिनंदंति मूढाः जरामृत्युं ते पुनरेवापियंति । अविद्यायामंतरे वर्तमानाः स्वयंधीराः पंडितंमन्यमाना जंघन्यमानाः परियंति मूढा अन्धेनैव नीयमाना यथांधाः ॥ न कर्मणा न प्रजया धनेन त्यागेनैके अमृतत्वमानशुः ॥ यदा चर्मवदाकाशं वेष्टयिष्यंति मानवाः । तदा देवमविज्ञाय दुःखस्यान्तो भविष्यति ॥ तद्यथेह कर्मचितो लोकः क्षीयते एवमेव अमुत्र पुण्यचितो लोकः क्षीयते ॥ परीक्ष्य लोकान् कर्मचितान् ब्राह्मणो निर्वेदमायान्नास्त्यकृतः कृतेन ॥ अक्षय्यं ह वै चातुर्मास्ययाजिनः सुकृतं भवति । अपाम सोममृता अभूम ॥ यामिमां पुष्पितां वाचं प्रवदंत्यविपश्चितः ॥ वेदवादरताः पार्थ नान्यदस्तीति वादिनः ॥ कामात्मानः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम् ॥ क्रियाविशेषबहुलां

भोगैश्वर्यगतिं प्रति ॥ भोगैश्वर्यप्रसक्तानां तयापहृतचेतसाम् ॥ व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते ॥ दूरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगाद्धनंजय ॥ आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन ॥

या सर्व वाक्यांचा असा अर्थ कीं, भयदुःखरूप संसारसागरास तरून अखंड सुखसमाधानरूप मोक्षधामास पोंचण्यास एका तात्विक आत्मस्वरूपज्ञानाच्या भक्कम व अव्यंग नौकेवांचून ज्या दुसऱ्या कोणत्याही क्रियारूप, योगरूप तपोरूप उपासनारूप इत्यादि नौका ह्मणून कोणी समजल्या असतील, त्या नौका मुळींच धड नाहींत; त्यांस छिद्रें फार आहेत. त्यांचा विश्वास ज्यांनीं धरला, त्याच आपल्या कल्याणाचें साधन ह्मणून त्यांचें जे अभिनंदन करीत सुटतात; ते मूर्ख आहेत; ते पुनः पुनः जन्मजरामरणयुक्त भयदुःखमय संसारसागरांतच गटांगळया खात राहतात. खरोखर, ते अविद्यारूप अंधाराच्या रात्रींत चांचपडत असून धिटाईनें पंडितंमन्य होण्यानें अत्यंत निकृष्ट गतीस जातात. हे स्वतःच शहाणे बनलेले या भयंकर संसारसागरांत सर्वत्र परिभ्रमण करीत राहतात. पक्के मूर्खच ते! आंधळ्यास मार्गदर्शक ह्मणून जसा एखादा आंधळाच नायक मिळावा तसें या मूढास जणों कोणी तरी मूर्खच नायक मिळतो असें ह्मटलें पाहिजे. अनेक क्रियाकलाप जरी केले, विपुल संतति आणि संपत्ति या जरी असल्या तरी अक्षय्य आनंदरूप मोक्ष देण्यास यांपैकीं कोणीच समर्थ नाहीं, केवळ सर्वसंगत्यागपूर्वक आत्मतत्त्वज्ञानाच्या योगानें मात्र अधिकारी जीव त्या मोक्षगतीस पावतात. कोणी ह्मणेल, 'आह्मी आत्मतत्त्वज्ञानावांचूनच त्या आनंदरूप मुक्तिपदास जाऊं.' त्यास इतकेंच बजावून सांगणें आहे कीं, जर कोणी लोक कातड्याप्रमाणें आकाशास आपले अंगाभोंवतीं पांघरूं शकतील, किंवा त्या

आकाशाची घडी करूं शकतील, तर मात्र आपल्या दिव्य आत्मतत्त्वस्वरूपास न जाणतांही या जीवांच्या दुःखांचा अंत होईल. तात्पर्य, आकाश हें पांघरतांही कोणास येत नाहीं; व त्याची घडीही कोणी घालूं शकत नाहीं; त्याप्रमाणें आत्मतत्त्वज्ञान नसेल तर, भयदुःखनाशही होऊं शकत नाहीं. अर्थात् भयदुःखनाश होण्यास एक आत्मतत्त्वज्ञानरूप साधनासच शरण गेलें पाहिजे. कर्मकष्ट करून कोणताही पदार्थ येथें मिळवा. त्याचा क्षयच होतो हें आपण प्रत्यक्ष पहातों. याप्रमाणें परलोकप्राप्त्यर्थ मोठें पुण्य करून जो पदार्थ किंवा विषय मिळविला जाईल. त्याचाही क्षयच होणार, तोही नाश पावणार. एवंच इतकी कर्मकटकट करून जें जें मिळवावें त्याचा नाश होतो हें सोपपत्तिक सिद्ध आहे. आणि तसा अनुभवही सार्वत्रिक आहे; असें परीक्षणपूर्वक मनांत आणलें असतां या विचारवंत भल्या मनुष्यास तर सांसारिक विषयसुखाचा वीटच येतो. आणि त्याचा असा निश्चय होतो कीं, तो अक्षय्य आनंदरूप मोक्षलाभ त्या कर्मजालांत, त्या कर्माडंबरांत पडून मिळणार नाहीं. वास्तविक वेदशास्त्रांतील पूर्वपक्षीय मतासच ज्यांनीं सिद्धांत ह्मणून पतकरलें, त्यांच्या मूर्खपणाचें किति वर्णन करावें ! जे बेधडक असें बरळत सुटतात कीं, तो ईश्वरही येथें कोणी नाहीं; आणि तो मोक्षपदार्थ तर त्याहूनही नाहीं. यांची समजूतच अगोदर कशी युक्तिशून्य आहे ती पहा. ह्मणजे कर्मेंकरून जें मिळवावें तें संपतें, जें रचावें तें खचतें, जें मांडावें तें मोडतें, असा सर्वत्र अनुभवसिद्ध प्रकार असतांना हे दीडशाहाणे ह्मणतात कीं, चातुर्मास्ययाग करणाऱ्यास अक्षय्य फल मिळतें ! सोमपानानेंच आह्मी अमर ! अशा रीतीनें कर्मभोगांत गुंग झालेल्या या कर्मजड व कामातुर मतिमंद जीवांस तें सिद्धान्तज्ञान काय होय ! ह्मणजे जो मरणशील, तो अमर व्हावा कसा; किंवा अमरस्वभावच

असेल तर त्यास सोमरसाच्या पानानें अधिक काय होणार? हा युक्तिवाद त्यांच्या पुढें व्यर्थ आहे. यांचा निश्चयच असा कीं, अनेक क्रियाकलाप करावेत, पुनः पुनः जन्मास यावें, मरावें, इहपर लोकांत उच्चनीच योनीस पावावें, रागद्वेष धरावेत, भोग भोगावेत, यापेक्षां दुसरें कांहीं तत्त्व नाहीं. अर्थात् वेदशास्त्रांतील पूर्वपक्षरूपी कर्मकाण्डांतील, नुसतीं ऐकण्यापुरतींच रमणीय अशा गुळचट स्तावक वाक्यांनीं यांस भूल पाडली; दुसरें काय ह्मणायचें! सृष्टींत प्रायः असेच सारे जीव. त्यामुळें निर्मळ विचार आणि प्रबल प्रमाणें यांच्यायोगानें तत्त्वनिश्चय करणारी बुद्धि ह्मणजे समजूत यांचे अंतःकरणांत शिरकतच नाहीं. तात्पर्य, ब्रह्मदेवाच्या लोकापासून तों तृणवल्ली इत्यादि जातीच्या जीवलोकापर्यंत या अतिविस्तीर्ण व भयदुःखमय अशा संसारसागरांतच हे जीव परिभ्रमण करीत असणार! यांना कर्मकष्टरूप संसारदशाच अकुंठित असावयाची! तात्पर्य, आत्मतत्त्वज्ञानापुढें कर्मादिक अनेक प्रकारचीं सर्व साधनें अत्यंत निकृष्ट, अत्यंत दुर्बल व सदोष आहेत; आणि अखंड आनंदस्वभाव व परम पुरुषार्थरूप अशा मोक्षप्राप्तिविषयीं तें निर्मळ आत्मतत्त्वज्ञानच एक निष्टंक साधन आहे असा जो सर्वमान्य सिद्धांत आहे, त्याचा अंगीकार करावा. तात्पर्य, मोक्षवादी सर्व शास्त्रें व शास्त्रकार असेंच प्रतिपादन करतात कीं, नित्य निरंतर समाधानास्पद आणि अखंड आनंदरूप अशा त्या मोक्षाचा लाभ एका तत्वज्ञानानेंच होतो. याविषयीं कोणाचा मतभेद नाहीं.

इतका वेळपर्यंत आह्मीं एकच मुद्याची गोष्ट सांगितली. ती हीच कीं, सर्वांस आनंद पाहिजे, तो नित्य असावा, आणि अशी जी नित्य अखंडानंदस्थिति हाच मोक्ष. संसारस्थितींत त्याचें दौर्लभ्य जरी आहे, तरी आत्मतत्वज्ञानानें त्याची सुलभताही खास आहे;

आणि तो मोक्ष आत्मतत्वज्ञानानेंच लभ्य आहे; इतर कोणत्याही साधनानें त्याची प्राप्ति नाहीं. या बाबतींत आह्मीं वेदशास्त्रोक्त निवडक प्रमाणांचाही उपन्यास केला; आणि अशा रीतीनें मुख्य मुद्दा तेवढा स्पष्ट पुढें ठेवला. आतां याबद्दल उपपत्तीचा काथ्याकूट मात्र फारसा आम्ही करीत बसत नाहीं. कारण, एका दृष्टीनें आमच्या मतें ती रिकामपणची करमणूक आहे. आतुर झालेल्या व कार्यावर नजर असलेल्या अशा सारग्राही साधक जीवाचें त्याबद्दल फारसें अडलेलें नसतें. तो विश्वासानें मुद्दा तेवढा पतकरून आपल्या कार्यास लागतो. उपपत्तीचा काथ्याकूट करीत बसण्यांत इष्टसिद्धीस विलंब लागणार, तो त्यास सहन करवत नसतो. मुद्दा फार थोडक्यांत असतो. आणि उपपत्तीचा तो काथ्याकूट केल्यानंतर तरी तो थोडक्सा मुद्दा तेवढाच जवळ ठेवावा लागतो. हें मनांत येऊन त्यास असें वाटत असतें कीं, मग उगीच वेळ तरी कां दवडावा ? किंबहुना तो काथ्याकूट कितीही जरी करण्यांत आला, तरी शेवटीं पुनः "असें तरी कशावरून" ही चिकित्सा, हें संशयाचें दीर्घसूत्र संपतच नाहीं, असा प्रकार पुष्कळ असतो, आणि 'या तर्कटी वेडेचारांनीं स्वहितास अंतरलों', अशी आपली हतभाग्यता तोंड वेंगाडून कबूल करावी लागते. आतां अन्धपरंपरान्याय कांहीं चांगला नाहीं, आम्ही तदनुसारीही नाहीं, हें मात्र लक्षांत ठेवावें. उपपत्ति कळल्यानें मनाची निर्मळता राहते हें आम्हांस कबूल. पण उपपत्तीची आवश्यकता कोठें असावी आणि कोठें नसावी याबद्दल कांहीं ईयत्ता ठरलीच पाहिजे. ज्याविषयीं अविश्वास करण्याला कोणतेंच योग्य कारण नाहीं, जेथें दगा होण्याची कल्पना करणें हेंच घातुक आहे, अशाही ठिकाणीं अविश्वास ! म्हणजे मग विश्वास किंवा श्रद्धा, भाव, हे शब्दच जगांतील कोठेंही भाषेंत यावयास नको होते. कोणी "म्हणेल

कीं, ज्यापासून या जीवाचें अत्यंत तात्विक कल्याण, अशा तत्वज्ञानाचे बाबतींत देखील विश्वास किंवा श्रद्धा यांचा प्रवेश काय ह्मणून असावा ? त्यास आमचें असें सांगणें आहे कीं, ही तक्रार चालायची नाहीं. ह्मणजे जेथें लक्षपूर्वक दृढ विचारापासून तत्वज्ञानाचा उदय होऊन प्रत्यक्ष समाधानास्पद आनंदाचा अनुभव होणें आहे, अशा ठिकाणीं देखील प्रथमतः जिज्ञासूचे जवळ श्रद्धा पाहिजे असते. किंबहुना या जीवाचे स्वरूपांत श्रद्धारूप वस्तु एक घटकावयवच आहे असेंही विचारान्तीं सिद्ध करतां येतें; याविषयीं प्रमाण असें कीं.

श्रद्धामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्धः स एव सः ॥
श्रद्धावित्तो भूत्वा समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम् ॥
श्रद्धावाँल्लभते ज्ञानं तत्परः संयतेन्द्रियः ॥
अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति ॥

ह्मणजे जीवाच्या सर्व प्रवृत्तींत श्रद्धा हेंच अंग विशेष असतें; ज्याची जशी श्रद्धा, तो तसल्या श्रद्धेचेंच रूप घेऊन उठतो. तेव्हां अखंडानंदरूप मोक्षप्राप्त्यर्थ ज्याला आत्मतत्वज्ञान पाहिजे असेल, त्यानें तें खरेदी करण्यास आपले बरोबर श्रद्धा हेंच एक विपुल धन घेऊन श्रीगुरूला शरण जावें. तो श्रीगुरु संशयच्छेत्ता आणि अनुभवसंपन्न असला पाहिजे हा प्रकार स्वतंत्र आणखी आहेच. मुमुक्षूचे जवळ श्रद्धा असणें अवश्य आहे. कारण, नाहींतर तिच्यावांचून विचार करण्याविषयीं तरी याची प्रवृत्ति होणार कशी ? शेवटीं सांगावयाची गोष्ट अशी कीं, निग्रहशील व प्रयत्नशील असा साधक मुमुक्षु जीव श्रद्धावान् असेल तरच त्यास ज्ञान प्राप्त होतें. तरच तद्विषयीं यास भावना होऊं लागते, तरच त्याचे ठिकाणीं अनुभव होण्याची आशा, आणि तरच यास तें उदित झालेलें ज्ञान लाभतें. फाजील चिकित्सा करण्याकडे मनाचा ओढा असण्यानें, व श्रद्धालुता मुळींच नसण्यानें

अनुभव होत नसतो; आणि त्यामुळें अज्ञानरूप भ्रमादिकांच्या जाळ्यांत अडकून हा नाशासच पावतो. तात्पर्य, शेवटीं आम्ही असें सांगणार कीं, श्रद्धावान् मुमुक्षु तर उत्तम अधिकारी, आणि फाजील चिकित्सक किंवा तर्कटी तो येथें अधम अधिकारी ठरतो. जगांतील न्याय मात्र वेगळा आहे; म्हणजे अतिशंकाखोर तो जगांत मोठा बुद्धिमान् म्हणून मानला जातो; आणि श्रद्धालु भाविकास जग वेडगळ समजतें. शास्त्रसंमत तर्क हितावह आहे इतकें कबूल आहे; तसा तो तितका असलाच पाहिजे. पण सिद्धान्तभूत शास्त्रप्रामाण्याचा तर अगोदर मूळ पाया, त्या पायावर आपल्या विचाराची इमारत, असा एकंदरींत प्रकार असला पाहिजे. तरच समाधानास आधार; आणि समाधान होईल तर शांतिसुख मिळणार. एरवीं वास्तविक पाहतां, अनादिसिद्ध वेदशास्त्रानें जें रहस्य सांगून ठेविलें आहे, परमपूज्य श्रीव्यासश्रीमच्छंकराचार्यादिकांसारख्या महानुभाव असाधारण पुरुषधुरीणांनीं त्या वेदशास्त्रोक्त रहस्याचें स्पष्टीकरण देऊन जें आम्हांस आमचें हितगुज कृपा करून कळवून ठेविलें आहे; श्रीज्ञानेश्वर, नाथमहाराज, श्रीसमर्थरामदासस्वामी, इत्यादि तत्ववादि साधुवर्यांनीं जें परमगुह्य अगदीं प्राकृतांत दयार्द्रचित्त होऊन आमच्या पुढें प्रकट केलें, तें सर्वथा एकजात आहे, अगदीं एकरस तें आहे, असें असतां त्याविषयीं साशंक राहावें, त्या ईश्वरीय महापुरुषांवर विश्वास नमावा, याविषयीं कांहीं तरी योग्य कारण कोणी दाखवूं शकेल काय? त्यांनीं आमची दगदग वांचविली; कोणीकडे तरी या मतिमंद जीवाची बुद्धि भरकटत जाणार, तों तिला आळा घातला. हे त्यांचे फार फार उपकार मानून निमूटपणें आपल्या कार्यास लागावें. उगाच आपल्या स्वताच्या शहाणपणाचे घमेंडींत बसण्याची आतां वेळ नाहीं; तथापि युक्तीची वाट मोडून आम्ही चालू असें मात्र कोणी समजूं नये. असो.

आत्मतत्त्वज्ञानानें अक्षय्य आनंदरूप मोक्ष प्राप्त होतो, हा जो मुख्य मुद्दा नुकताच आम्ही सप्रमाण सांगितला, त्यावरून आतां दुसरा एक सिद्धान्त अगदीं ओघानेंच पुढें येत आहे. तो असा कीं, जर तशा अखंडानंदरूप मोक्षाचे प्राप्तीला केवळ आपल्यास आपल्या तात्त्विक स्वरूपाविषयींचें एक शुद्ध ज्ञान हेंच साधन आहे, तर मग आपल्याला नानाविध दुःखभयरूप संसारबंध होण्यास आपल्याच त्या तात्त्विक स्वरूपाविषयींचें कांहीं तरी एक अज्ञान हेंच मूल कारण असलें पाहिजे. अर्थात् भयदुःखरूप संसारबंधाचें कारण अज्ञानच आहे. अज्ञानापासून भय, दुःख, शोक, भ्रम, अनेक दोष, हानि, विकल्प, संशय, असंभावना, विपरीत भावना, भेदबुद्धि, द्वेष इत्यादि अनेक अनर्थ होतात; आणि शुद्धतत्त्वज्ञानापासून समाधान, सौख्य, स्वास्थ्य, शांति इत्यादि अनेक लाभ होतात, हें सर्व जगास प्रत्ययानें कबूल आहे. डोळे उघडून रस्त्यानें चाललें असतां, विंचू, कांटे, सर्प, धोंडे खाचखळगे, विष्ठा, कूप इत्यादिक अनर्थ मध्येंच आले तर त्यांस टाळून आपला बचाव करतां येतो; आणि डोळे मिटून अस्ताव्यस्त चाललें असतां आपल्यास भयंकर दुःखें होतात; किंबहुना मरणाची पाळी देखील येऊन पोहोंचते. तोच प्रकार, विचार आणि अविचार किंवा निर्मळ ज्ञान आणि दुष्ट अज्ञान यांच्या संबंधानें आहे. तेव्हां आपल्यास आपल्याच तात्त्विक स्वरूपाविषयीं अज्ञान असेल तर आपली कांहीं तरी मोठी हानिच होत असली पाहिजे. आणि निर्दोष तत्त्वज्ञान असेल तर आपला लाभच झाला पाहिजे. यांत असंभाव्य किंवा अयुक्त कांहींच नाहीं. अर्थात् ज्ञानानें जर मोक्ष होतो तर अज्ञानानें संसारबंध होणार हा न्यायच झाला. स्वतत्त्वज्ञानानें अखंड आनंदरूप मोक्ष मिळतो, याबद्दल जीं अनेक निबडक प्रमाणवचनें आम्हीं नुकतींच निर्दिष्ट केलीं आहेत, तींच प्रमाणवचनें

संसारबंधास एक अज्ञानच कारण आहे, या बाबतींतही पर्यायानें सर्वथा लागू आहेत; तेव्हां दुसरी स्वतंत्र प्रमाणें देत बसून येथें विशेष जागा अडविणें व काल दवडणें हें योग्य नाहीं, असो. येथें आतां असा एक नियम सिद्ध होत आहे कीं, ज्याविषयींच्या शुद्धज्ञानानें जें नष्ट होतें, तें त्याविषयींच्या अज्ञानापासूनच उत्पन्न होतें; ह्मणजे दोरी ती दोरीच आहे, असें पक्कें उमगत असल्यास, साप ह्मणून विपरीत बुद्धि होत नसते, किंवा पूर्वीं झाली असली तर ती नष्ट होते. अर्थात् साप अशीच समजूत झाली असल्यास ती बुद्धि आणि तो साप अशीं दोन्हीं त्या दोरीविषयींच्या न कळण्यापासूनच उत्पन्न होतात असें ह्मटलें पाहिजे. येथें दुसरा कोणताही प्रकार त्यांच्या उत्पत्तिविषयीं साधक नाहीं. एवंच अज्ञानापासून असे चमत्कारिक परिणाम घडतात हेंही सर्व जगास प्रतीत आहे. याच नियमानुसार आत्मतत्त्वाच्या ज्ञानानें जर नित्यानंदरूप मोक्ष प्राप्त होतो, तर त्याच आत्मतत्त्वाविषयींच्या अज्ञानापासून भयदुःखरूप संसारसंज्ञित बंध होणें हें सयुक्तिक आणि संभवनीय आहे. तसेंच ज्ञान आणि अज्ञान हीं दोन्हीं परस्परांशीं विरोधी आहेत असें ठरतें. ज्ञानास अज्ञान प्रतिबंधक असतें, पण ज्ञान अज्ञानाचें नाशक आहे. ज्ञान व अज्ञान अशीं हीं दोन्हीं अंगीकृत करून आपल्या बंध–मोक्षाची व्यवस्था ठरली आहे. ज्ञानानें अज्ञानाचा निरास होईपर्यंत तें ज्ञान, अज्ञानानें प्रतिबद्ध राहतें. ह्मणजे ज्ञानानें जर अज्ञानाचा निरास होणें इष्ट आहे तर अज्ञान प्रथमतः आहे असें सर्वांसच कबूल करणें आहे. तें कधींपासून असतें हें कोणासच माहीत नसतें. असल्यास त्याचा निरास मात्र ज्ञानानें होतो. अर्थात् हें अज्ञान अनादि असलें तरी सान्त ह्मणजे विनाशि असतें, हेंही सर्वसंमत आहे. मायावादाचें मूळ यांतच आहे. माया ह्मटली म्हणजे तिच्यांत मिथ्यात्वाचा अंश

शिरलाच पाहिजे. हा मायावाद पतकरल्याशिवाय हें बंधमोक्षाचें कोडें उलगडतच नाहीं. ह्मणजे जर बंध सत्य असेल तर तो विच्छिन्न व्हावयाचाच नाहीं. ज्याचा तिन्ही काळीं बाध किंवा नाश होत नाहीं, तें सत्य; आणि ज्याचा बाध किंवा नाश होतो तें मिथ्या; अशी येथील परिभाषा आहे. अर्थात् ज्याअर्थी बंधाचा छेद होतो, भयदुःखादिक अनर्थांचा निरास होतो, त्याअर्थी तो सकारण व सपरिवार असा बंध मिथ्या ठरतो; व मोक्ष सत्य ठरतो; ह्मणजे तो नित्यच आहे. अर्थात् तो आपले ठिकाणीं स्वभावतः स्वरूपभूतच आहे, असें मानल्यावांचून सोय नाहीं. तसा न मानल्यानें आत्यंतिक पुरुषार्थाची शक्यताच ठरणार नाहीं. तेव्हां मोक्ष नित्य आहेच. असें असून भ्रमवशात् तो स्वरूपतः प्राप्तसा वाटत नसतो; याचेंच नांव माया किंवा अज्ञान असें ह्मटलें पाहिजे. यावरून मोक्ष कोणत्याही प्रकारच्या कृतीपासून उत्पन्न होणारा नाहीं. तो कृतिजन्य असणारा होईल तर त्याचा नाश होणार. कारण जें कृतक तें विनाशी; आणि जें विनाशि तें मिथ्या. तेव्हां या न्यायानें मोक्षही मिथ्या ठरूं जाणार; पण तसा तो इष्ट नाहीं. तो नित्य ह्मणून अपेक्षित आहे, अर्थात् तो नित्य असाच शेवटीं ठरतो, आणि बंध मिथ्या ठरतो; कारण तो भ्रमजन्य आहे; जो भ्रमानें उत्पन्न होतो, त्याचा ज्ञानानेंच बाध किंवा नाश होतो. जर भ्रम सत्य असूं इच्छील, तर त्याची निवृत्ति ज्ञानानें किंवा इतर कशानेंही होणार नाहीं. पण त्याची निवृत्ति, इष्ट, साध्य आणि शक्य आहे, त्या अर्थी तो भ्रमात्मकच असला पाहिजे. भ्रम म्हणजे मायाकार्य, असो. सर्वथा भयदुःखरूप असा हा संसारसंज्ञित सर्व अनर्थ अज्ञानकार्य आहे, किंवा भ्रमात्मक तो आहे अथवा तो मायामय आहे. थोडक्यांत मायावाद तो असाच आहे. एकंदरीत आत्मतत्त्वज्ञानानें मोक्षाचा लाभ होतो, म्हणजे तो त्या ज्ञानापासून

उत्पन्न होतो असा अभिप्राय नाहीं. कारण उत्पन्न जो होतो त्याचा नाश होतो, हा आपला नियम ठरलाच आहे, तेव्हां ज्ञानानें मोक्ष प्राप्त होतो यांतील रहस्य इतकेंच कीं, मूळ स्वयंसिद्ध असलेली, पण अज्ञानानें झांकल्यासारखी झालेली अशी ती मुक्तदशा, ज्ञानानें अज्ञानावरणाचें विदारण होऊन व्यक्ततेस येते. आतां ओघालाच एक गोष्ट आली म्हणून ती सांगून जाणें आम्हांस अवश्य वाटतें. ती गोष्ट अशी. कितीएक लोक असें म्हणतात कीं, हा मायावाद किंवा अज्ञानवाद वेदोक्त नाहीं. माया असा शब्दही उपनिषद्भागांत नाहीं. तो अलिकडच्या वेदांत्यांनीं दुसऱ्या मतांतून घेऊन आपल्या प्रक्रियेंत घुसडून दिला आहे असें बेधडक ते बोलतात. न जाणों कदाचित् त्यांचा सत्य संसार खोटा ठरल्यास शून्यत्वाच्या उदासीन दर्यांत आपण पडूं कीं काय, अशी त्यांस भीति वाटत असावी! एरवीं, 'माया' असा शब्द अज्ञानादिक अनेक पर्यायांसहित आपल्या वेदशास्त्रांत अगदीं टळटळीत असून त्यांस तो दिसूं नये याचें दुसरें कोणतें योग्य कारण असणार? आम्हांस जीं वचनें अगदीं ठळक दिसतात त्यांपैकीं कांहीं वचनें आम्ही येथें देत आहों. तीं अशीं—

अस्मान्मायी सृजते विश्वमेतत् तस्मिंश्चान्यो मायया सन्निरुद्धः ॥ मायां तु प्रकृतिं विद्यान् मायिनं तु महेश्वरम् ॥ तस्यावयवभूतैस्तु व्याप्तं सर्वमिदं जगत् ॥ अजामेकां लोहितशुक्लकृष्णां बह्वीः प्रजाः सृजमानां सरूपाम् ॥ इन्द्रो मायाभिः पुरुरूप ईयते रूपं रूपं प्रतिरूपो बभूव ॥ मायाभासेन जीवेशौ करोति, माया चाविद्या च स्वयमेव भवति । दूरमेते विपरीते विषूची अविद्या याच विद्येति ॥ अविद्यायां बहुधा वर्तमाना वयं कृतार्था इत्य-

भिमन्यंते बालाः ॥ तस्मै मृदितकषायाय तमसस्पारं दर्शयति भगवान्सनत्कुमारः ॥ त्वं हि नः पिता योऽस्माकमविद्यायाः परं पारं तारयसीति ॥ तस्य त्रय आवसथास्त्रयः स्वप्नाः ॥ मायया ह्यन्यदिव भवति । वाचारम्भणं विकारो नामधेयं मृत्तिकेत्येव सत्यमिति श्रुतयः । अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यंति जन्तवः॥ माययापहृतज्ञाना आसुरं भावमाश्रिताः ॥ दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया ॥ मामेव ये प्रपद्यंते मायामेतां तरंति ते ॥ तेषामेवानुकंपार्थमहमज्ञानजं तमः ॥ नाशयाम्यात्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता ॥ ज्ञानेन तु तदज्ञानं येषां नाशितमात्मनः ॥ तेषामादित्यवज्ज्ञानं प्रकाशयति तत्परम् ॥

या सर्व वचनांचा असा अभिप्राय कीं, परमात्मा मायी होऊन ह्मणजे मायेच्या योगानें या सर्व विचित्र जगतास निर्माण करतो; अर्थात् विश्वाभास हा त्याच्या मायेचा चमत्कार आहे, ह्मणजे विचारांतीं ती मिथ्या, तिचें कार्य मिथ्या, असा निश्चय होतो. याच मायेच्या योगानें संसारांत हा जीवात्मा बद्ध, संकुचित किंवा प्रतिबद्ध झाला आहे. येथें मायेनें तो तसा झाला आहे असें ह्मटलें ह्मणजे वास्तविक त्यास बंधन नाहीं. एका दृष्टीनें हीच माया जगताचें मूळ घटक तत्व आहे, किंवा घटास मृत्तिकेप्रमाणें ती उपादान कारण आहे; आणि या मायातत्त्वाचा संग्रह करून तिचा विनियोग करणारा तो परमात्माच होय; हें सर्व जगत् त्याच्याच अवयवांनीं व्याप्त आहे, ह्मणजे हा परमात्मा आपल्या मायावैभवासह या जगतांत भरला आहे. अशा या अनादि एका मायेपासूनच अनंत प्रकारचे हे स्थावरजंगम पदार्थ निर्माण होतात. ती माया लाल, पांढरी, आणि काळी अशा तीन रंगाची आहे; ह्मणजे सत्त्व, रज, तम अशा तीन गुणांची ती आहे,

जग त्रिविध आहे या ह्मणीवरून हें उघडच दिसतें. हा सर्वसाक्षीभूत परमात्मा अगदीं एक असतांना बहुरूपसा वाटतो; ह्मणजे जी वस्तु केवळ एकच अगदीं अद्वितीय आहे. आणि ती जर अनंतरूपाचीशी भासते, तर मग यांत कांहीं तरी माया आहे, अथवा कपट आहे. ह्मणजे अर्थात् तेथें मिथ्यात्वाचा प्रकार आलाच. प्रत्येक वस्तूंत त्याचा प्रतिभास आहे ह्मणजे त्याला मिथ्यात्व येतें. एवंच जीव आणि ईश हे मूळ दोन आभासच आहेत; आणि ते पण मायाकृत आहेत; ह्मणजे मायेच्या योगानें ते दोनसे वाटतात. हा जीवेश्वरविभाग पतकरून त्या एकच प्रकृतीस माया आणि अविद्या अशा संज्ञा शास्त्रानें योजल्या आहेत. सर्व स्थूल सूक्ष्म सृष्टीस याच दोन कारण असल्यामुळें त्या कोणापासून आज नवीन झाल्या आहेत असें कांहीं समजणें व विचारणें योग्य नाहीं, यामुळें त्या स्वतः अनादि अशाच कल्पित आहेत. बंधमोक्षादि सर्व व्यवस्था, अविद्या आणि विद्या या दोन अंगीकृत उपाधींवर भागवतां येते. हे दोन्ही उपाधी परस्परांत अत्यंत विरोधि आहेत, त्यामुळें अविद्येनें बंधन, आणि विद्येनें मोक्ष अशी व्यवस्था ठरली आहे. अर्थात् हा प्रकार मायामूलक असल्यावरून मिथ्या आहे असा निश्चय कर्तव्य असतो. तथापि अविद्येच्या कक्षेंत असून अनेकविध होऊन म्हणजे अनंत होऊन, त्यांतच आपण कृतार्थ आहों, धन्य आहों, असें जे मानतात, ते बाल आहेत, ह्मणजे अत्यंत मूर्ख ते आहेत; दुसरें काय ! त्यांना यांतील मिथ्यात्वाविषयींचा निश्चय होत नाहीं म्हणून ते बाल होत. येथें इतकेंच रहस्य लक्षांत राहिलें पाहिजे कीं, निमित्तविशेषाचे दृष्टीनें या अचिंत्य आणि मिथ्यारूप मायेस ‘ प्रकृति, अविद्या ’ असे संकेत करण्यांत आले आहेत. भगवान् सनत्कुमार आपल्या एका शुद्धचित्त अशा शिष्यास तमाच्या, ह्मणजे अंधकाराच्या अर्थात् मायेच्या

पाराचें दर्शन करवितात, ह्मणजे जेथें तो अज्ञानसंज्ञित अंधकार नाहीं, अशा परमात्म्याची किंवा आपल्या तात्त्विकरूपाची त्यास ओळख करून देतात. याठिकाणीं त्याच मायेस 'तम' असें ह्मटलें आहे. कृतार्थ होणारे शिष्य आपल्या श्रीगुरूचें असें स्तवन कारतात कीं, 'हे गुरो, तूंच आमचा खरा पिता आहेस; कारण, तूंच खरें रक्षण करतोस, ह्मणजे आह्मांस अविद्यारूप समुद्राच्या परपारास तूंच तारून नेतोस.' तेथेंही पुनः मायेस अविद्या असा संकेत करण्यांत आला आहे; अर्थात् ती अज्ञानरूप आहे. ह्मणजे तिचा आवेश झालेल्या जीवास कोणत्याही वस्तूचें तात्त्विक ज्ञान नसतें; ह्मणून ती माया अज्ञानसंज्ञित ठरते. जागृति, स्वप्न, सुषुप्ति इत्यादि सर्व अवस्था स्वप्न आहेत, ह्मणजे तत्त्वस्वरूपाविषयीं शुद्ध बोधरूप जागृतीच्या दृष्टीनें हा सर्व बंधमोक्षादि लक्षण जगद्व्यवहार स्वप्नच आहे; आणि तो स्वप्नरूप आहे असें ह्मणण्यांत तो मिथ्या भासरूप किंवा मायिक आहे असें समजलें पाहिजे. माया हा प्रत्यक्ष संकेत आणि अविद्या, अज्ञान, तम, शोक, स्वप्न इत्यादिक त्याचे पर्यायभूत अनेक दुसरे शब्द जेथें प्रत्यक्ष आहेत, अशीं वैदिक वाक्यें प्रमाणार्थ स्पष्ट रीतीनें आम्हीं दाखविलीं. इकडे भगवद्गीतेंत श्रीकृष्ण परमात्म्यांनीं जे उद्गार काढले आहेत, त्यांतील भावार्थ असा कीं, अज्ञानाच्या योगानें अंतर्दृष्टि ह्मणजे बुद्धि ही आवृत होते. अर्थात् विचारशक्ति गुप्त राहते; त्यायोगानें हे जंतू, हे पामर जीव मोह पावतात; भ्रमवशात् भयदुःखादिकांनीं व्याकुल होतात. हें अज्ञानच माया. या मायासंज्ञित अज्ञानानें ज्ञानास मुकल्यासारखे होऊन हे जीव असुर होतात; ह्मणजे देहेन्द्रियप्राणपोषक असे केवळ जडवादी ते बनतात. ही गुणमयी माझी ईश्वरीय माया दुर्लंघ्य तर खरीच; तथापि केवळ मलाच जे शरण येतात, ते या मायेप्रत तरून जातात. या जीवांविषयीं केवळ दया ह्मणून मी त्यांच्या हृदयस्थ

असूनही गुरुरूप होऊन उज्ज्वल अशा ज्ञानदीपानें, ह्मणजे निर्मळ विवेकरूप प्रकाशेंकरून त्यांच्यांतील अविवेकजन्य, मिथ्या भ्रांतिरूप मोहान्धकाराचा नाश करतों. तेव्हां मग, सूर्य जसा सकल वस्तूंचें प्रकाशन करतो, त्याप्रमाणें, विवेकजन्य ज्ञानानें त्यांचा मोहांधकार नष्ट झाला असतां त्या जीवांस सर्व वस्तुविषयीं यथार्थ प्रकाश होतो; आणि आपल्याही तात्त्विक स्वरूपाचा बोध त्यांस टळटळीत स्फुरूं लागतो. हा जो भगवद्वाक्यांतील भावार्थ आम्हीं सांगितला, यांत तरी अज्ञान आणि माया हे दोन सांकेतिक शब्द आले आहेत, यावरून त्यांत कांहीं तरी विशेष अभिप्राय असणें अगदीं साहजिक आहे; तरी पण तो पदार्थ सर्वथा एकच आहे याबद्दल मात्र शंका नाहीं, असो. हीं जीं श्रौत व स्मार्त अशीं वचनें आह्मीं दिलीं, हीं अत्यंत बलिष्ठ आणि सर्वथा मान्य अशीं आहेत. त्यांतील भावार्थ लक्षांत घेतां, मायावाद किंवा अज्ञानवाद अथवा विवर्तवाद हा अगदीं वेदशास्त्रप्रतिपादित आहे याबद्दल पक्की खात्रीच झाली पाहिजे. माया, अज्ञान, प्रकृति, स्वभाव, अविद्या, तम, शोक, स्वप्न इत्यादिक जे शब्द पूर्वोक्त वाक्यांमधून दिसत आहेत, त्यांतील विवक्षित भावार्थ अगदीं एक आहे. यांपैकीं 'अज्ञान' हाच शब्द आह्मी प्रसंगीं वापरीत जाऊं इतकें मात्र लक्षांत ठेवावें. आत्मतत्त्वाविषयींच्या अज्ञानानें भयदुःखरूप संसारबंध आहे आणि आपल्याच तात्त्विक स्वरूपाविषयींच्या ज्ञानानें त्या संसारबंधाचा उच्छेद होऊन अखंडानंदरूप मोक्षाचा लाभ होतो, असा हा आमचा वेदशास्त्रीय घंटाघोष आतां कोणीही विसरणार नाहीं. या बाबतींत आह्मीं दिलेल्या सर्व वचनांचा विचारपूर्वक स्वारसिक अर्थ मनांत आणतां अद्वैतसिद्धांत निष्पन्न होतो हा एक मोठाच मुद्दा आहे, तो आह्मी येथें फक्त सुच-

वून ठेवितों. पुढें योग्य प्रसंगीं त्याविषयींचा खुलासा आह्मांस कर्तव्य आहे, तो करण्यास आह्मी विसरणार नाहीं; असो.

आतां ज्या अज्ञानानें आपल्यास बंध आहे, तें अज्ञान काय आहे, कसें आहे, याचें थोडेंसें स्पष्टीकरण केलें पाहिजे. येथें अज्ञान ह्मणजे मुळींच कांहीं ज्ञान नसणें अथवा ज्ञानाचा अत्यंताभाव असाच केवळ अर्थ नाहीं. अर्थात् अज्ञान ह्मणजे ज्ञानाभाव, असा तो अभावरूप पदार्थ आहे असें व्यावहारिक दृष्टया ह्मणतां येणार नाहीं; तर तो भावरूप पदार्थ आहे. पण हें अज्ञानतत्व किंवा मायातत्त्व अनिर्वचनीय आहे; ह्मणजे वस्तुतः त्याच्या स्वरूपाचें लक्षण निश्चितपणें सांगतां येत नाहीं असें तें आहे. कोणा एखाद्यालाच त्याचें लक्षण सांगतां येत नसेल असें कोणी ह्मणेल, तर तसें मात्र नाहीं. अर्थात् कोणालाही त्याचें लक्षण निश्चितपणें सांगतां येणें शक्यच नाहीं. आतां कोणी असें ह्मणेल कीं, तें अज्ञान अनिर्वचनीय आहे, असें जर सांगणें आहे तर इतकेंच ह्मटल्यानें त्याच्या लक्षणाचें किंवा स्वरूपाचें निर्वचन ह्मणजे निरूपण होऊन चुकलें, असें होत नाहीं काय? यावर अशी तोड आहे कीं, तें अनिर्वचनीय आहे असें ह्मटलें तरी त्याचें तें अनिर्वचनीयत्वही अनिर्वचनीयच आहे. ह्मणजे 'अज्ञान हें अनिर्वचनीय आहे' असें जें ह्मणणें आहे, तें अशा एका ओघानें प्राप्त होत असतें कीं, जो जो कोणी त्याचें जें कोणतेंही किंवा कसलेंही लक्षण ठरविण्यास प्रवृत्त होतो, त्याच्या त्याच्या प्रत्येकीं लक्षणांत दोष दिसून येतात, तेव्हां तें सर्व लक्षण रद्द होत असतें; आणि मग अर्थातच त्या लक्षणकथकांचे पदरीं अनिर्वचनीयत्व हें अज्ञान किंवा मायातत्व आहे असें म्हणणें भाग पडतें. एतावता हें त्याचें लक्षण आहे असें ह्मणणें योग्य होत नाहीं. लक्षण ठरविण्यांत दोष कसे येतात तें पहा. आपण येथें असें लक्षण करूं

कीं, हें मायासंज्ञित अज्ञानतत्व 'सद्रूप' आहे, अथवा असें त्याचें लक्षण ठरवूं कीं, तें 'असद्रूप' आहे; अथवा असें आपण त्याचें लक्षण बांधूं कीं 'तें सदसद्रूप आहे' तथापि या तिन्ही प्रकारच्या लक्षणांपैकीं एकही बरोबर नाहीं. कारण, त्यास 'सत्' असें ह्मणावें तर ज्ञानेंकरून शेवटीं त्याचा बाध होतो. तेव्हां त्यास सत् ह्मणजे त्रिकालीं सत्यरूप असें ह्मणणें प्रशस्त नाहीं. 'असत्' असें ह्मणावें तर तें भासल्यावांचून राहत नाहीं; तेव्हां त्यास असत् (सर्वथा अभावरूप) असें तरी कसें ह्मणावें? बरें, त्यास सदसद्रूप ह्मणावें तर एका पदार्थाचे ठिकाणीं सत् आणि असत असे दोन विरुद्ध धर्म एक कालीं असणें, हेंही अघटितच. ह्मणजे उजेड आणि अंधार, ज्याप्रमाणें एके ठिकाणीं कधींच राहत नाहींत, त्याप्रमाणें येथें सत्व आणि असत्व ह्मणजे असणें आणि नसणें हे दोन विरुद्ध धर्म, एकावर एकाच कालीं राहूं शकत नाहींत. तसेंच हें मायानामक अज्ञानतत्व नित्य आहे, कां अनित्य आहे, कां नित्यानित्य आहे इत्यादिक प्रश्नही निरुत्तर आहेत. ह्मणजे ही माया किंवा हें अज्ञान अनिर्वचनीय आहे. शेवटीं तुच्छ आहे. विचार करण्यासारखी वस्तु नाहीं असें ह्मणून शाहण्यानें त्याचा नाद सोडावा असा भावार्थ आहे. बोलून चालून अज्ञानच तें ! त्याच्या नादीं कोणीं लागावें? त्याच्या नादीं लागणें ह्मणजे आपण व्यर्थ अज्ञानरूप होणें असें आहे. या अज्ञानाचा पिच्छा धरणें ह्मणजे आपणच पुरे वेडे ठरणार. त्यापेक्षां आपण आपल्यापुरता नीट विचार करावा. उगाच या मिथ्या अज्ञानाचा विचार करणें व्यर्थ आहे, त्यास विचार सहन होत नाहीं; ह्मणजे विचारापुढें तें टिकत नाहीं. त्याविषयीं विचार करणें,ह्मणजे नसतेंच महत्व त्यास देणें असें आहे. तरी पण त्याच्याविषयीं फार बोभाटा झाला आहे. तो एकदाचा मिटवून टाकला पाहिजे. ह्मणजे